IRBK-0100734

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र ७३४

IRBK-0100734

श्री

# संगीत मातृपदी-नाटक.

लेखक—

**बाळकृष्ण नारायण पांडे.**

( सं. अलौकिक सत्वधीरता अर्थात् कबीर, शब्दवेध, भारतलक्ष्मी ( द्रौपदी वस्त्रहरण ) गोस्वामी तुलसीदास ( हिंदी ) सं. 'वर पाहिजे,' पुनरागमन, वेणीचें वेड या नाटकांचे कर्ते )

प्रकाशक:—

**बॉम्बे कमर्शिअल कंपनी,**
बुकसेलर्स, पब्लिशर्स, माधवबाग-मुंबई. नं. ४.

**आवृत्ती पहिली.**

मार्च १९२६.

**किंमत १२ आणे.**

IRBK-0100734
IRBK-0100734

मुद्रकः—
रा. . चिंतामण सखाराम देवळे.
मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया
सोसायटीज् होम, सँडहर्स्ट रोड,
गिरगांव मुंबई.

( या नाटकाचे रंगभूमीवरील व चित्रपटावरील प्रयोग भाषांतर, प्रकाशन, वगैरे सर्व प्रकारचे हक्क लेखकाकडे आहेत. )

प्रकाशकः—
सदाशिव भालचंद्र पाठक
बॉम्बे कमर्शिअल कंपनी,
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स
माधवबाग, मुंबई, ४.

म. ग्रं. सं. ठाणे,
नं. ६३४


# अर्पणपत्रिका.

**मातृदेवो भव । पितृदेवो भव ।**

माझी परमपूज्य मातृदेवता

कै० ती० रू० सौ० **लक्ष्मीबाई पांडे**

व

परमपूज्य पितृदेव

कै० ती० रू० **नारायण बाळाजी पांडे**

या लक्ष्मीनारायणाच्या

स्मृतिसमाधीवर

**हें नाट्यपुष्प**

अत्यंत भक्त्यादरपूर्वक समर्पण असो.

**बा. ना. पांडे.**

श्रीरामसमर्थ.



# प्रस्तावना.

माझे प्रियमित्र रा. वा. ना. पांडे यांनीं लिहिलेल्या प्रस्तुत " मातृपदीं– " नाटक ग्रंथाला महाराष्ट्रवाचक बंधु भगिनींच्या पुढें ठेवण्याचा सुयोग साधल्याबद्दल मला अत्यानंद होत आहे.

सन १९१२ सालीं मी बऱ्हाणपुरास मिलमध्यें डाईंग मास्तर असतांना रा. पांडे यांची सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या जागेवर तेथेंच नेमणूक झाली. एका नाट्यप्रयोग प्रसंगींच त्यांची ओळख होऊन त्यांच्याबरोबर पुढें लौकरच स्नेहभाव वृद्धिंगत झाला. निरनिराळ्या व्यवसायानिमित्त एका ठिकाणीं जमलेल्या समान आवडीच्या कांहीं मंडळींचा साहाजिकच एक गट निर्माण होऊन तो ' लालबाग क्लब ' या नांवानें प्रतिष्ठापन्न झाला. क्लबांत मुख्य विषय नाट्यचर्चेचा. गुरुवर्य खाडिलकर, केळकर, देवल, कोल्हटकर, गडकरी इत्यादि विद्वान् नाटककारांच्या नाटकांतील निरनिराळ्या सौंदर्य स्थानांची ( beauty spots ) निवड होऊन त्यावर सुंदर चर्चा होऊं लागली व आमच्यांतून रा. पांडे हे यशस्वी नाटककार होतील अशी त्याच वेळीं आम्हांस आशा वाटूं लागली. पुढें सन १९१४ सालीं श्री. अण्णासाहेब देशपांडे इलिचपुरकर यांचे विनंतिवरून त्यांचे गणपत्युत्सवाकरितां रा. पांडे यांनीं " अलौकिक सत्वधीरता " अर्थात् कबीर हें आपलें पहिलें नाटक लिहिलें. व तेव्हांपासून आजपर्यंत त्यांच्या लेखणींतून एकंदर आठ नाटकें प्रसंगोपात्त निर्माण झालीं आहेत. प्रस्तुत नाटक ओळीनें पांचवें असून मुद्रामंदिरांतून बाहेर पडणारें हें त्यांचें पहिलें नाटक आहे. यापूर्वीचीं त्यांचीं नाटकें दुर्दैवाच्या आघातानें मागें पडलीं आहेत व त्याबद्दलचें विवेचन करण्याचा मोह आवरत नसला तरी याठिकाणीं त्याबद्दल विस्तृत लिहून जागा अडवीत नाहीं ! असो.

पांच वर्षांच्या सतत सहवासानंतर धंद्यानिमित्त एके ठिकाणीं आलेल्या लालबाग क्लबाच्या मंडळीची पुन्हां पांगापांग होऊन लालबाग क्लब नामशेष झाला. त्यांतच आपल्या मनोहर गायनानें तल्लीन करून सोडणारे क्लबाचे अध्वर्यू रा० एस्, आर. रावेरकर हे अकालीं कालवश झाले. रा० रावेरकर नाट्य आणि गायन या दोन्ही गुणांत उत्तम तरबेज होते व ते जर धंदे वाईक नट झाले असते तर त्यांनीं रंगभूमीवर खात्रीनें नांव मिळविलें असतें. रा. पांडे ह्यांच्या लेखणीबद्दल त्यांना फार आदर वाटत असून त्यांचीं नाटकें वाङ्मयास भूषणभूत होतील हा त्यांच्या शेवटच्या आजारांतील आशिर्वाद आज घटकेस आठवून त्यांचीं नाटकें प्रत्यक्ष रंगभूमीवर पाहवयास ते जिवंत नाहींत हें पाहून हृदय विदीर्ण होतें ! ते हयात असते तर ही प्रस्तावना वास्तविक त्यांच्याच हातून लिहिली जावयाची. पण कठोरकाळानें तें शक्य केलें नाहीं व ती जबाबदारी माझ्यावर येऊन पडली व तसें करतांना लालबाग क्लबाची आठवण होणें अपरिहार्य होऊन थोडीशी प्रस्तावनेची प्रस्तावना लिहणें भाग पडलें याबद्दल महाराष्ट्र रसिकांची मी क्षमा मागतों.

प्रस्तुत नाटकाचा काल नाटकाचें पहिलें पान वाचतांच किंवा प्रयोगाच्या प्रारंभीच्या प्रवेशांतच कळण्यासारखा आहे. राष्ट्राची संस्कृती त्याच्या काव्य नाटकांवरूनच परीक्षिली जाते. अर्थात् नाटकाला इतिहास जरी ह्मणतां आलें नाहीं तरी इतिहासाचा हा एक मनोरंजक दुवा आहे असें ह्मटल्या वांचून राहवत नाहीं. महात्मा गांधींची " अनत्यांचारी असहकारिता " ही आपल्या देशाच्या इतिहासांतील महत्वाची गोष्ट असून तिच्यामुळें झालेलें कालपरिवर्तन चिंतनीय आहे. महात्माजींच्या या अभिनव घोषणेनें साऱ्या जगांत विचारक्रांति घडवून आणली आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. सर्व साधारण प्रासंगिक गोष्टींवर नाटकें, कादंबऱ्या व काव्यें लिहिण्याची वहिवाट सर्व देशांतून आहे. भारतनाट्य संमेलनाच्या एका सन्माननीय अध्यक्षांनीं तशी सूचनाही केली होती व त्याप्रमाणें कांहीं नाटकें लिहिलींही गेलीं आहेत. " मातृपदीं "—नाटकांत रा० पांडे यांनीं असहकारितेचें तत्वज्ञान ग्रथित करण्याचा प्रयत्न केला आहे.

रा. पांडे यांच्या प्रस्तुत नाटकांत मार्मिकता, रसपरिपोष, विषयतादात्म्य इत्यादि नाट्य प्रयोगाकरितां अवश्य असणाऱ्या सर्व बाजू वाचकांना आढळून येतील. सोपें,

सुंदर व सुबद्ध कथानक, मनोवेधक व हृदयस्पर्शी प्रसंग, निसर्गसुंदर पौर्वात्य मनोरचनेच्या भूमिका, व प्रमाणशीर आरोहावरोह इत्यादि गोष्टी वाचकांना अगर प्रेक्षकांना या नाटकांत दिसून येतील. या नाटकांत कै० गडकऱ्यांच्या अनुप्रासयुक्त भाषारचनेचें अनुकरण केलें असून तें बरेंच निर्दोष झालें असल्याचें दिसून येईल. नवीन कल्पनायुक्त व अर्थाला सोपीं अशी अनुप्रास युक्त बरींच वाक्यें या नाटकांत असलेलीं आढळून येतील. यावरून रा. पांडे यांनीं कै० गडकरी यांचें बाह्यानुकरण केलें नसून कै० गडकऱ्यांबद्दल असणाऱ्या त्यांच्या भक्तीला साजेसें तें अनुकरण झालेलें आहे असेंच मला वाटतें. नाटकांतील पद्यें ही सोपीं, गोड आणि सार्थ आहेत. मानवी कृति सर्वथा निर्दोष असूं शकत नाहीं तथापि वाङ्मयाला व रंग-भूमीला भूषणभूत अशी रा० पांडे यांची ही कृती आहे अशी माझ्या प्रमाणेंच माझ्या वाचक बंधूभगिनींची खात्री होईल अशी आशा करून व ह्या त्यांच्या कृतीकडे सर्वांनीं सदय दृष्टीनें पहावें अशी विनंति करून व रा० पांडे यांचे हातून उत्तरोत्तर उत्तम नाटकग्रंथ बाहेर पडोत अशी जगदीश्वराजवळ प्रार्थना करून बरीच लांबलेली ही प्रस्तावना आटोपती घेतों.

बाई हरकुंवरची चाळ, ठाकुरद्वार, मुंबई.

फाल्गुन व॥ २-१८४७. **विनायक अनंत देवधर.**

ना ३० २-२-

श्रीराम.

# लेखकाचें हद्गत.

या नाटकाचा प्रथम प्रयोग नाट्यकला प्रसारक संगीत मंडळीकडून यवतमाळ येथें ता. १-३-१९२४ इ० रोजीं शिवराम नाटकगृहांत झाला. सदर मंडळीचे मालक रा० लेले बंधू यांचा परिचय माझे मित्र रा० गोविंदराव आपटे यांनीं माझें हिंदी " गोस्वामी तुलसीदास " नाटक वाचून पहाण्याच्या निमित्तानें करून दिला. त्यावेळीं या नाटकाचे कांहीं प्रवेश लिहिलेले होते ते वाचून पहातां त्यांनीं या नाटकाची मागणी केली व त्याप्रमाणें नाटक लवकरच संपूर्ण होऊन ईश्वरदयेनें वरील तारखेस रंगभूमीवर आलें व हल्लीं तें पुस्तकरूपानें महाराष्ट्र वाचक बंधूभगिनींच्या भेटीस येत आहे. त्यांतील न्यूनाधिक्याबद्दल क्षमा करून त्याच्याकडे प्रेमदृष्टीनें पहाण्याबद्दल माझी सर्वत्रांना सविनय प्रार्थना आहे.

माझे परम प्रिय मित्र रा० दादासाहेब देवधर यांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें लालबाग क्लबाची, व त्या चिरस्मरणिय कालाची आठवण आज अगदीं ताजी समोर उभी रहात आहे. रा० एस्. आर. रावेरकर यांच्या आठवणीनें तर हृदय अत्यंत शोकाकुल होतें. रा० दादासाहेब देवधरांप्रमाणें त्यांनींही माझ्या कसल्याही बऱ्यावाईट ओळीला वात्सल्यभावनेनें चांगलें म्हणून माझा उत्साह वाढवावा व मला कार्यतत्पर करावें. या प्रसंगीं त्यांच्या आत्म्याला प्रेमादरानें नमस्कार करणें मीं माझें कर्तव्य समजतों.

रा० दादासाहेब देवधर यांचे मजवरील प्रेमाबद्दल मी कितीहि आभार मानले तरी ते अपुरेच होणार आहेत. मी त्यांचा सर्वकाल ऋणी आहें एवढेंच म्हणणें बस्स होईल. प्रस्तावनेंत त्यांनीं माझ्या लेखनाबद्दल काढलेले उद्गार त्यांच्या मजवरील निरातिशय प्रेमामुळें निघालेले आहेत असेंच मला वाटतें.

सुप्रसिद्ध ब्लॉकमेकर रा० दादासाहेब बेर्डे, रा० अनंत काशीनाथ टेंबे, रा० बाबीकाका अभ्यंकर रा० भिकोबा पाटणंकर व रा० नानासाहेब आराधे रा० दत्तोपंत बरवे या सन्मित्रांनीं ही मला प्रेमोपकृत केलें आहे.

नाट्यकला प्रसारक संगीत मंडळीचे मालक रा० गोविंदराव व गणपतराव लेले यांचे मला अंतःकरणपूर्वक आभार मानले पाहिजेत. प्रचलित विनोदापासून बऱ्याच दूर असलेल्या या नाटकाला पसंत करून त्याला योग्य सजावटीनें व अत्यंत परिश्रमानें त्यांनीं रंगभूमीवर उत्तम स्वरूपांत आणलें आहे. या कामीं त्यांना त्यांच्या नट वर्गाची मनःपूर्वक मदत झाली असून त्या सर्वांचा व संगीत सौंदर्याचा उत्तम उठाव होण्यास कारणीभूत असलेले रा० विठलराव तबलजी व नारायणराव पेटीवाले यांचाही मी आभारी आहें.

प्रथम प्रयोगाच्या पूर्वीं कांहीं दिवस मी आजारी असल्यामुळें व त्या पूर्वीही नाटक बसत असतांना मजवरील आपलेपणाच्या भावनेनें रा० गोविंदराव आपटे, कंपनीचे माजी म्यानेजर, यांनीं तालमी घेण्यांत व सर्व बाजूंनीं प्रयोग यशस्वी करण्यांत जी मेहनत घेतली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

सरते शेवटीं मुंबईचे बॉम्बे कमर्शियल कंपनीचे मालक रा० सदाशिवराव पाठक यांनीं मोठ्या हौसेनें पुस्तक शक्य तितक्या लवकर व सुबक छापून प्रसिद्ध केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. पुण्याचे फोटो आर्टिस्ट रा० दाते यांचे उत्कृष्ट काम वाचकांच्या पुढें आहेच. ईश्वरकृपेनें सर्वांचें कुशल होवो.

बऱ्हाणपूर,<br>
फाल्गुन वद्य ५ शके १८४७

**बा० ना० पांडे.**

श्रीराम समर्थ

# मातृपदीं.

## अंक १ ला, प्रवेश पहिला.

( सिंहासनावर श्रीभारतमातेची मूर्ति प्रस्थापिली असून
तिची नुकतीच पूजा करून रामराव स्तवन
करीत आहे असा पडदा. )

[ रामराव लग्नास तयार झालेल्या वराच्या पोषाखांत.
पोषाख सव खादीचा आहे. ]

**रामराव**—( स्तवन करितो )

### पद.

**नमो आई कुलदेवि भारतमाते ।**
**सत्व तेज तव दावि ॥ धृ० ॥**
**सुश्रुता तपोमूर्ति, योगबलवती ।**
**सत्व तेज तव दावि ॥ १ ॥**
**तुझिया चरणिं प्राण वाहि तनय हा ।**
**सत्व तेज तव दावि ॥ २ ॥**

**रेवती**—( घाईघाईनें प्रवेश करून ) भावोजी ! चला लौकर, मिरवणूक केव्हांची खोळंबली आहे ! अगबाई तुमचा असा हा उदास चेहरा कां ? भावोजी ! नुकतेच पडलेले, दोन अश्रूहि तुमच्या गालावर अजून दिसताहेत ! असल्या मंगलप्रसंगीं—

[library stamps, partly legible] २-२-२०

**रामराव**—वहिनी, खरंच विचारशील तर हा प्रसंग मंगल आहे का अमंगल आहे हेंच मला कळत नाहीं! सर्व मंगलाचं मंगल, माझं प्रेमनिधान कधींपासून (देवीकडे बोट दाखवून) दीन झालं आहे हें तुम्हांला माहितच आहे! वहिनी! माझ्या मातृभूमीच्या हांकेस ओ देऊन मी लॉ क्लास सोडला, आज वर्षभर ज्या तत्त्वावर माझा दृढ विश्वास आहे त्या असहकारितेच्या तत्त्वाला हृदयाशीं बाळगून गांवोगांव लोकजागृती करीत हिंडलों त्या मला दैवानं आज असं पेंचांत धरलेलं पाहून मन अतिशय खिन्न झालं आहे! वहिनी! खरंच सांगूं? या माझ्या मातृभूमीचा दुर्दैवाशीं लागलेला जबरीचा राक्षसी विवाह होऊन आज कित्येक वर्षं ती दास्याच्या दावाग्नींत-तप्त होत असतांना तिला त्यांतून सोडवायला मोकळं रहायचं सोडून मी संसारसुखांत तल्लीन व्हावं किंवा काय हा एकच विचार जसजशी ही लग्नाची घटका जवळ जवळ येत चालली आहे तसतसं माझं काळीज चर्र करून सोडीत आहे. वहिनी! दास्याच्या दोरखंडाच्या दारुण व्यथेनं इकडे माझ्या मातृभूमीनं तळमळावं व मी निर्लज्जासारखं नव वधूच्या नाजूक बाहूंचं वेष्टन आपल्याभोंवतीं गुंडाळून घेऊन निर्वेधपणाचं नालायकीशीं लग्न लावून नर्म परिहासांत काळ कंठावा या प्रश्नाचं उत्तर अजून माझ्या मायाग्रस्त मनाला देतां आलं नाहीं. वहिनी! तूं मला क्षमा कर पण माझा पाय येथून हलतच नाहीं!

**रेवती**—भावोजी! मला तुम्हांला काय उत्तर द्यावं हेंच कळत नाहीं. पण मला आपलं आमच्या बुद्धीप्रमाणं असं वाटतं कीं लग्नामुळें कुणाच्या देशसेवेंत अंतर पडतंच असं कांहीं अगदीं नक्की सांगतां येत नाहीं. त्यांतून बायको जर अगदीं जोडीला जोड मिळाली तर कार्याला दुप्पट अवसान नाहीं कां यायचं! मला सांगा सगळ्याच तरुणांनीं मुळीं लग्नच करायचं नाहीं असं ठरविलं तर जग चालायचं तरी कसं म्हणतें मी!

**रामराव**—वहिनी ! जग कसं चालायचं तसं चालेल पण हिंदुस्थान मात्र आज कित्येक वर्षं चालायचा थांबला आहे ! वहिनी, तुमची विचारसरणी बरोबर आहे ! पण कांहीं गोष्टींना कांहीं वेळेला असाधारण महत्व येत असतं. आपल्या मातृभूमीची आजची स्थिती तुम्हांला माहित नाहीं असं नाहीं ! वहिनी ! " आतां यापुढें निव्वळ गुलाम पैदा करण्याचे दिवस नाहींत." हे महात्माजींचे शब्द तुमच्या ऐकण्यांत अगर वाचनांत असतीलच ! सध्यां देशाला स्वतंत्र तरुणतरुणींच्या कर्तबगारीची आवश्यकता आहे ! उसन्याची उधारी उद्यां वसूल करण्यापेक्षां आजच्या नगद नाण्यावर भारतवर्षाचं सगळं जीवित अवलंबून आहे ! असंख्य तरुणतरुणींचे प्रसंग पडल्यास बळी देऊन, भूमातेच्या निर्जीव जिवांत जीव आणायला आज आतांच्या मार्गाचं अवलंबन करणं अगत्याचं आहे ! वहिनी ! पहा ही पुण्यदेवता ही ज्ञानगर्भिणी, ही त्रिलोकवंद्य जगज्जननी आज कोणत्या संकटांत सांपडली आहे ! (विकल होऊन)पहा ! माझ्या आईच्या उजव्या खांद्यावर नुकतीच झालेली दारुण जखम पहा ! त्यांतल्या अशुद्धानं ती सारखी न्हाइली जात असतांना विवाहांत सुगंधी उटणीं अंगाला लावून न्हाण्यांत मी कसा आनंद मानूं ! जगाच्या रांगत्या अवस्थेकडे पाहून आजपर्यंत तिच्या चरणाजवळ बसून ज्यानं पाठ घ्यावेत त्याच मात्रागमनी जगानं आज तिला ज्ञानाच्या गोष्टी सांगण्याचा आव घालावा ! ज्यांना मुरडण्याला नाकंसुद्धां नाहींत असल्या नालायकांनीं निर्लज्जपणानें हिच्याकडे पाहून आपलीं नकटीं नाकं मुरडावींत, दोन दिवसांच्या ह्या दिवाळखोरी दुनियेंत दिमाखाची दिवटी पाजळून दावदोरीचा दावा सांगावा; सर्व साधनांनीं संपन्न असूनसुद्धां जिच्या लेकरांना सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काबाडकष्ट करूनदेखील पोटभर खायला मिळूं नये, कांगांवखोर कावळ्यांनीं " काळा आदमी " म्हणून केराप्रमाणें लेखावं व मिजासीच्या

मिरासीचे मालक केवळ आम्हीच असं वाटेल त्या मानवी मर्कटानें म्हणावं व अफाट आकाशाच्या खालील जमिनीवर केवळ मोकळ्या हवेचीसुद्धां मालकी आम्हांकडे असूं नये हा दैवाचा दुर्विलास खंबीर प्रयत्नाच्या धडाडीनेंच थांबवावा लागेल! वहिनी! माझं हे पुराण तुला पोरकटपणाचं वाटण्याचा संभव आहे! पण मी काय करूं! आजचा दिवस आनंदाचा आहे का दुःखाचा आहे हेंच मला समजत नाहीं! जीवनांत फरक का अंगीकृत कार्याशीं फारकत हा एकच प्रश्न मला भंडावून सोडीत आहे!

**रेवती**—भावोजी! असं काय बर करायचं? आम्हीं बायकांनीं तुम्हाला शहाणपण तरी काय शिकवायचं! तिकडे खोळंबा किती होतो आहे पाहिलांत का? विवाहानं आपल्या कार्याला कांहीं बिघाड होईल असं मला तरी बाई नाहीं वाटत! त्यांतून आमची सरलाताई म्हणजे कशी अगदीं अनुरूप वधू आहे तुम्हांला! अहो कार्याला आणखी दोन हातांचा जोर लागेल! तुम्ही चतुर्भुज झालांत—अगबाई! भावोजी चला गडे! (घड्याळ पाहून) मुहूर्त अगदीं जवळ आला! बघा वाजंत्रीदेखील जोरानं सनई वाजवायला लागले! तुम्ही असे कष्टी होऊं नका! आजीबाईनीं जर तुम्हांला असं पाहिलं तर त्यांना काय वाटेल! केवळ त्यांच्याकरितां आणि मामंजींच्याकरतां ना तुम्ही लग्नाला कबूली दिली!

**रामराव**—आजीची आज्ञा आणि बाबांना दिलेलं वचन! वहिनी, देशसेवकाला फकीर झालं पाहिजे तें एवढ्याकरितां! कुणाची आज्ञा नको व कुणाशीं वचनबद्ध होणं नको! व्यवहाराशीं तत्त्व हें असं नेहमीं भांडत असतं! असो! ईश्वरेच्छा! चला वहिनी! मला एकदां या भानगडींतून पार पडलंच पाहिजे! बाबा, मी आपणांला तेव्हांच विनंती केली कीं, मला माझ्या मताप्रमाणं वागण्याची परवानगी द्या! पण मी आपणाला काय ह्मणून दोष देऊं! दोष माझाच आहे! ध्येयाची जोपासना करायची ती जळत्या निखाऱ्यावर उभं राहून करावी लागते. जीवाचा जन्माचा जिव्हाळा मरणाच्या मोलाच्या

मुशींत घालून तापविल्यावांचून शिवाचा साक्षात्कार व्हायचाच नाहीं मग आतां उशीर कां ! ( देवीस वंदन करून ) ! मातोश्री ! आराध्य दैवते ! द्या मला आपला आशिर्वाद द्या !

पद.

**भगवती बाल करीत प्रणाम। स्वमनिं सदा तवचि स्फुरवि नाम ॥ धृ० ॥ तव पदसेवा एकच झाला। विषय मानसा-राम ॥१॥ शर्करा जशी पिपिलिकेला। एक गमे सुखधाम ॥ २ ॥ घडवि तुज जसे वाटे घडणें। मति भ्रमली बेफाम ॥ ३ ॥**

( डोकीवरून फूल पडतें ) अहाहा हा प्रसाद ! हा महाप्रसाद. वहिनी, चला आतां तुम्ही न्याल तिकडे येतों व तुम्ही सांगाल तें करितों ! माझ्या आईनें मला हा प्रसाद दिला आहे आतां नाहीं मला कसली काळजी.

( गडबडीनें जातात )

अंक १ ला प्रवेश १ ला समाप्त.

---

# अंक १ ला—प्रवेश २ रा.

**स्थल—रस्ता.**

( **पात्रें**—डेप्युटी सुपरिंटेंडेंट विश्वासराव व शिपाई मोटारींतून येतात. )

**विश्वासराव**—( शिपायास ) राम खिलावन !

**शिपाई**—हुजूर ! ( लष्करी सलाम )

**विश्वास०**—देखो ! तुम रावसाहेब भादवे को पेहचातने हो ना ?

**शिपाई**—हां हुजूर !

**विश्वास०**—( पड्यांत वरातीच्या वाद्यांचा आवाज ऐकून ) मिरवणूक के साथ वे जा रहे है उनको मेरा सलाम बोलो और कहो कि

हमको जरा थोडे देरके लिये आपके मुलाकात की दरकार है. मैं यहीं ठहेरतां हूं. जल्द वापिस आव हां ! देर नहीं करना !

शिपाई—अभी हाजिर होता हूं ( सलाम ) मोटर भी ये नजदीकके चौकीपर छोड जाता हूं !

**विश्वास०**—ठीक है जाव ! ( स्वगत ) आजच्यासारखी माझ्या मनाची कधींहि कुचंबणा झाली नाहीं. माझ्याच हातानं माझा अगदीं जवळचा नातलग रामराव कैद व्हावा असला अकल्पित आणि विलक्षण प्रसंग परमेश्वरानं कां आणला ? रामराव लग्नाला वधुगृहीं निघावा व वधुवरांच्या डोक्यावर आशिर्वाद—पूर्वक मंत्राक्षता टाकण्याचें टळून माझ्या हातानें शृंखलेची मगरमिठी त्याच्या हातांत घट्ट बसावी असला भयंकर योग निर्माण करणाऱ्या परमेश्वरा तुझ्या चमत्कृतीजनक लीलेनें मी अगदीं दिङ्मूढ झालों आहें ! आजच दिवस हें वॉरंट थोपवून धरूं का ? सरले ! तुझ्या पतीला ऐन वेळीं तुझ्यापासून दूर नेणाऱ्या या तुझ्या विश्वासदादाला क्षमा कर ! भूलोकावरील यमाचा दरबार अशी सार्थ संज्ञा ज्या खात्याला आहे त्या पोलीसखात्यांत जर मी शिरलोंच नसतों तर रामराव ! तुझ्या बाबांनीं मला या नोकरीची शिफारस करून मला एकदम डे. सुपरिंटेंडेंट करविला त्या वेळीं त्याच्याच हातानं आपल्या प्रिय पुत्राच्या हातांत हातकड्या घातल्या जातील अशी कल्पना तरी झाली असेल काय ? न्यायमूर्ती ! आजचा हा प्रसंग आपण स्वर्गांतून पहात असाल काय ? आपण लाविलेल्या झाडाचं फळ विषारी नाहीं ही आपली खात्री आहेना ! बाबासाहेब ! हायकोर्टाच्या खुर्चीवर असतांना आपण वेळोवेळीं दाखविलेली निस्पृहता अधिकाराच्या मदानं मी डोळ्याआड केली नाहीं ह्याला आपला पवित्र आत्मा साक्षी आहे. आज केवळ प्राप्तकर्तव्य म्हणून हें कटु कर्तव्य करावें लागत आहे ! परवांचं रामरावाचं पुण्याचं व्याख्यान त्याला भोंवलं ! वास्तविक त्यानं उच्चार-लेला प्रत्येक शब्द खरा आहे ! पण पारतंत्र्याच्या प्रारब्धयोगानं पीडित

झालेल्या राष्ट्रांतील, साधूंच्या पवित्र वाणीलासुद्धां पापाच्या पर्वताचं स्वरूप मिळत असतं हा जित राष्ट्रांच्या इतिहासांतील नेहमींचा प्रसंग असतो! १२४ अ. छे मी जर आतां जास्त विचार करायला लागलों तर माझं मस्तक भडकून त्याच्या चिंधड्या उडून जातील! मला आतां या प्रसंगीं मन घट्टच केलं पाहिजे. नाइलाज आहे. कर्तव्य!

( रावसाहेब भाद्वे व शिपाई येतात. )

**रावसाहेब**—कां! विश्वासराव! मिरवणूकीबरोबर यायला फुरसत नाहीं वाटतं! अहो! तुम्ही असल्यावांचून बाबासाहेबांच्या मुलाचा विवाह कसा व्हायचा! तम्ही अगदीं जवळचे आप्त पण हेंहि खरंच आहे तुमच्या मागं नोकरीची भारी दगदग, त्यांतून आजकाल पोलिसखात्याकडे काम फार वाढलंय! नको पोषाखाबद्दल नको काळजी करायला, असेच आलांत तरी चालेल. रेवती सांगत होती कीं तुम्ही परभारेंच रावबाहादुरांच्याकडे यायचे आहांत म्हणून! बरं झालं चार पावलं मिरवणुकीबरोबरहि चालणं होईल! तेवढाच संतोष होईल रामरावाला!

**विश्वास**—अहो मला थोडं काम आहे—

**रावसाहेब**—( त्यांना मध्येंच अडवून ) मला माहित आहे तें आतां काय जास्त वेळ थोडाच राहिला आहे मुहूर्ताला. ( घड्याळ पाहून ) सारा अर्धा तास! असेच परभारें चला. मिरवणूक चौकांतून आतां या रस्त्यावर येईलच! हं हें माझं उपरणं घ्या अंगावर म्हणजे आपली दोन्हीं धोरणं संभाळलीं जातील! तुम्ही ड्यूटीवरचे ऑफिसर ( उपरणें जबरदस्तीनें विश्वासरावांच्या गळ्यांत घालतात व हात धरून ओढूं लागतात. )

**विश्वास**—पण रावसाहेब माझं म्हणणं तर ऐकून घ्या प्रथम! मला जरा नाजुक काम आहे थोडंसं—

**रावसाहेब**—तुमचीं पोलिसांचीं सारींच कामं नाजूक असतात त्यांतून आजकाल तर नव्या नाजूक कामांची यादी बरीच वाढलेली

आह ! हें नानकोआपरेशन् देशभक्तीचं खूळ उत्पन्न झाल्यापासून त्यांत भाग घेणाऱ्याची नांवनिशी जर पाहिली तर एक चांगला बृहन्नामकोशच तयार व्हायचा. बाकी सारे त्यांतले असायचे अचरटच !

**विश्वास**--( जरा कानाशीं लागून ) रावसाहेब ! ही मिरवणूक बंद करावी लागेल मला !

**रावसाहेब**--म्हणजे ? यांतहि तुम्हाला कांहीं " ब्रीच आफ् पीस" ( शांतताभंग ) दिसला काय ? अहो ही का त्या वेड्यापीर चळवळ्यांची मिरवणूक आहे का एकादा राष्ट्रीय जलसा आहे का काय आहे ? धन्य आहे बुवा तुमची ! अहो, मी आहेंना बरोबर ? विश्वासराव ! माझ्यावर तर नाहींना एकादं वारंट ! हो करतां काय ? तुमच्या " कॉनफिडें-शियल" रिपोर्टांत ( गुप्त माहिती ) कुणाबद्दल काय लिहून येईल याचा कांहीं नियमच नसतो ! बाकी आमच्याबद्दलचे रिपोर्ट तुमच्या डी. एस. पी. कडे गेले कीं पडलेच कचऱ्याच्या टोपलींत ! अहो अशाच तुमच्यांतला एका आचरटानं मी कुठल्याशा एका सभेंत हजर होतो व विलायती कापडाच्या बहिष्काराच्या ठरावावर टाळया पिटल्या म्हणून रिपोर्ट केला होता. कलेक्टर साहेबांनीं मला बोलावून समज देण्याचा प्रयत्न केला. त्यांची समजूत घालतां घालतां माझे नाकीं नऊ आले. छे, छे, ( रुमाल काढून वारा घेतात ). तुम्ही लोक कोणत्या वेळीं काय कराल याचा नेमच नाहीं !

**विश्वास**—आणि सध्यांचा प्रसंगसुद्धां अगदीं तसाच चमत्कारिक आहे ! आपण मला अगदीं बोलूंच देत नाहीं. पण खरोखरच माझं हल्लीचं काम जर मी आपणांला सांगितलं तर आपल्या तोंडचं पाणीच पळेल.

**रावसाहेब**—अँ ! असं काय आहे बुवा ! तुम्ही पोलिस लोक आपल्या मनाचा थांग लवकर लागूंच द्यायचे नाहींं ! ऊं !—सांगा पाहूं लवकर ! पण हें पहा एवढी ही लग्नाची गडबड उरकून जाऊं द्या मग करूं याचा विचार ! ( स्वगत ) माझ्यावर तर कांहीं प्रसंग नाहींना !

नाटके
२८९



रावसाहेब०–कोण हा दुर्धर प्रसंग ! [ अंक १ प्र० २ पृष्ठ ९.

ना ! हो उगीच कांहींतरी लोढणं गळ्यांत अडकायचं ! काय करावं ! ( उघड ) विश्वासराव, अशी कोणती चिंताजनक गोष्ट आहे ! सांगा पाहूं ! का आपली थट्टाच करतां ? होय ! थट्टाच ? अगदीं थट्टाच दिसते ! खरंच पोलिसखात्यांत तुम्ही एक रत्न आहांत ! असलीं मनमिळाऊ माणसं फार थोडीं नाहीं तर बाकीचीं पाहिलीं ती सदासर्वदा ताठ्यांतच ! हँ—हँ—हँ.

**विश्वास०**—रावसाहेब मला खरोखरच वेळ नाहीं आपल्याबरोबर फार वेळ बोलत बसायला ! तसंच या मिरवणूकींतहि मला भाग घेतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें ! ही मिरवणूक बंद व्हावी असं दुर्दैवानें लिहून ठेवलं आहे ( वारंट दाखवितात ).

**रावसाहेब**—कोण हा दुर्धर प्रसंग ! ह्या चळवळ्या लोकांनीं या भोळ्या पोराला बिघडवून असा फशीं पाडला ! आटपला कीं नाहीं सारा ग्रंथ ! मी चांगलं सांगत होतों कीं वकीली पास करून घेऊन सबजज्जाची जागा करून घे व रहा चैनींत ! हो म्हणजे ! हायकोर्ट जज्जाचा मुलगा ! वडिलाचं नांव केवढं मोठं आणि हा पहा कसा दिवटा निघाला ! हरहर ! सरसाहेब आजला जिवंत असते तर असला प्रसंग ओढवलाच नसता ! विश्वासराव ! नाहीं का हो याला कांहीं तोड ? निदान हें लग्न होईपर्यंत तरी हें थोपवून धरूं शकाल काय ? का मी येऊं तुमच्या साहेबाकडे ! पण ते कसले ऐकायला ! त्यांचे का या मूर्खांनीं कमी वाभाडे काढले आहेत ? विश्वासराव ! मग काय कसं करायचं !

**विश्वास०**—कसं काय करायचं म्हणजे ! हे वारंट बजावल्यावांचून गत्यंतर नाहीं. अगदीं जरूरी हुकूम आहे मला !

**रावसाहेब**—मग तेवढं शुभमंगल होऊन जाऊं द्या ना ! राव-बहादुर विचाऱ्याच्या कानावर घालूं ही गोष्ट ! नाहीं तरी हुकुमापुढं कोणाचं काय चालणार आहे ! पण—

**विश्वास०**—मला वाटतं एवींतेवीं वारंट बजावणं जरूर आहे तेव्हां लग्न लावण्यापूर्वींच त्याचा निकाल लावणं जरुर आहे. जाणूनबुजून दोन जिवांना संकटांत घालायला नको! निरपराधी सरलेच्या पुढं उगीच दुःखाचं ताट वाढून ठेवायचं व तिच्याबरोबरच रावबहादुरांच्या सर्व घराण्यालाहि दुःखांत लोटायचं त्यापेक्षां आपण हळूच रामरावाला जागृत करून ठेवा मी मुकाट्यानं बाकीचं सगळं आटपतों!

**रावसाहेब**—विश्वासराव, तेवढ्या तुमच्या हातकड्या तरी नका चढवूं या वेळेस! पोरगा पळून जायचा नाहीं! मी राहतों वाटलं तर जामीन त्याला! बाबासाहेबांचं माझं केवढं प्रेम! मरतांना त्यांनीं रामरावाचा हात विचाऱ्यांच्या आणि माझ्या हातांत दिला! आपल्या इस्टेटीचं आम्हांला ट्रस्टी नेमलं! पोरगा मोठा गोड सद्गुणी आहे हो! पण त्याच्या नशीबांत परमेश्वरानं असं लिहून ठेविलं होतं! विश्वासराव! तुम्हांला विशेष सांगायला पाहिजे असं नाहीं! तुम्हींहि त्याचे जवळचे नातलगच आहांत! पण पोराला अंमळ नरमपणानं वागवा! मी त्याच्याकडून माफी मागण्याची खटपट करितों.

**विश्वास**—चला लवकर ती पहा मिरवणूक आलीच. ( जातात. )

प्रवेश दुसरा समाप्त.

---

# अंक १ ला—प्रवेश ३ रा.

**स्थलः**—रस्ता.

(वरात चालली आहे. रावसाहेब मागें खिन्नमुखानें चालत आहेत. इतक्यांत विश्वासराव प्रवेश करितात व रामरावाच्या घोड्याजवळ जाऊन कांहीं कुजबुजतात. )

[ रामराव घोड्याखालीं उतरतो. ]

**विश्वास**—मला फार वाईट वाटतं, रामराव!

**रामराव**—छे! छे! दादासाहेब यांत वाईट वाटण्यासारखं काय

आहे ! आपण आपलं कर्तव्य करीत आहांत. तुमच्या ठिकाणीं मी असतों तरी मलासुद्धां असं करण्याशिवाय दुसरा कोणता मार्ग होता ! मी मोठ्या आनंदानं तुमच्या स्वाधीन होतों ! फक्त मला कौकासाहेबांच्या पायां पडूं द्या व त्यांचा अशिर्वाद घेऊं द्या ! ( रावसाहेबांस ) काकासाहेब मला निरोप द्या ! मला माझ्या मायभूमीचं बोलावणं आलं आहे ! आजकाल ती मूर्तस्वरूपांत कारागृहांत वास करीत आहे ! विवाहानिमित्त वर घोड्यावर बसून वधूच्या मंडपांत जायला मी वडलांच्या आज्ञेवरून तयार झालों आतां माझ्या आईची आज्ञा आपण पाळावयाला परवानगी द्या ! ( मंडळीस हात जोडून ) आपण सर्वांनीं आतां मला आज्ञा द्यावी ! ( सर्व जागच्या जागीं खिळून राहतात. ) ( पडद्यांत वंदे मातरम् ! ) बस्स याच एका शब्दाकडे नजर ठेवा व मला अनुज्ञा द्या. शांत रहा ! मी आतां वधूमंडपांतल्या तोरणाला स्पर्श करण्याऐवजीं स्वराज्यतोरणाला स्पर्श करण्याकरितां जात आहें. बंधूनो ! सरकारवर रागावूं नका ! मनानं, वाणीनं, आणि कृतीनं अनत्याचारी राहण्याची सर्वजण शपथ घ्या ! आपणांला आपलं कर्तव्य करावयाचं आहे कुणाचे दोष हुडकून काढायचे नाहींत ! आपणाला आत्मबलाच्या भरंवशावर आभाळाला गवसणी घालण्यासारखें महत्कार्य करायचं आहे ! ही प्रेमाची परिक्षा आहे ! देशप्रेम, बंधुप्रेम, ध्येयप्रेम व त्याबरोबर विश्वप्रेम हीं आपल्या प्रपंचाची चतु:सूत्री आहे. ( नमस्कार करून ) जा आतां ! मी येतों. ( वंदे मातरम् ) दादासाहेब ! चला, काकासाहेब, आपण मजबरोबर लांब येण्याचे श्रम घेऊं नका !

**रावसाहेब**—बाळ ! तुझ्या गोड वृत्तीचं गांभीर्य पाहून मला तुझं मोठं कौतुक वाटतं. पण बाळा ! असं एकदम वैराग्य घेऊन देशोद्धार होतो कां कधीं ! त्याला अनेक बाजूनें दीर्घकाल प्रयत्न करावे लागतात. देशाला तुझ्यासारखे तरुण हवे आहेत पण अगदींच बेछूट वृत्तीनं कार्याचा नाश नाहीं का होत ?

**रामराव**—काकासाहेब ! आजपर्यंत प्रयत्नांची शिकस्त झाली असं नाहीं का आपणांला वाटत ! कानठळया बसून जातील येवढ्यो मोठ्यानं ओरडून आजपर्यंत भारतवर्षानं आपलीं गाऱ्हाणीं नाहीं का सांगितलीं ! मग सौख्याची सुप्रभात आपल्या या देशाला अजून कां बरं दिसत नाहीं ! आपण या अफाट देवभूमीवर नजर फेंकिली नाहीं असं नाहीं माझं ह्मणणं ! आपल्या देशभक्तीबद्दल मला अत्यंत आदर आहे पण—पण काकासाहेब ! रहायला धड घर नसल्यामुळं व अंगावर बोटभर कपडा नसल्यामुळं गरीबांचीं गोठलेलीं शरीरें मेलेल्या शब्दांनीं आपली हांक देत असल्यामुळं ऐकूं येत नाहींत असं मेलेल्या हृदयाच्या जिवंत जीवांनीं म्हटलं तर तो त्यांचा दोष नव्हे ! जीवनकलहाच्या जंगी संग्रामांत जोरकसपणा संग्रहीं नसलेल्या आमच्या दुबळ्या बंधूंचें मनोगत समजून घ्यायला मनाला मौजेच्या माडीवरून काढून राष्ट्राच्या मोकळया मैदानांत आणलं म्हणजे वरकरणी जरी त्याला कोणी बेछूट म्हटलं तरी तें बंधुभावाला बिलगून साऱ्या विश्वाला शोधीत जात असतं। काकासाहेब ! काळाचा महिमा अगाध आहे ! प्रयत्नाची शिकस्त झाली म्हणजे मानवी मनोवृत्ती नशीबाला आपल्या हातानं बनवायला लागत असते व आजची ही चळवळ म्हणजे निजलेल्या नशीबाला नव्यानें उठविण्याची आहे ! दादासाहेब ! चला !

**विश्वास**—चला वेळ भारी झाली आहे ! आम्हांला गेलंच पाहिजे ! वास्तविक असं रस्त्यावर उभं राहाण्याची मनाई असूनदेखील मला यांना आपल्या जवळून नेववलं नाहीं.

( रेवती येते )

**रेवती**—भावोजी ! ( डोळ्याला पदर लावते )

**रामराव**—वहिनी ! मला तुम्ही निरोप द्यायला आलां आहांत ना ? मग तो आनंदानं द्या ! तुमच्यासारख्या सतींचा आशिर्वाद मला

अवश्य हवा आहे ! मी स्वराज्यमंदिराकडे जातांना तुमच्या मंगल सौभाग्यानं माझ्या मातृदेवतेच्या रूपानं येथें आगमन केलं आहे असंच मी समजतों. वहिनी ! तुमच्या मनोवृत्तीचा मला परिचय आहे !

**रावसाहेब**--रेवती ! या पोराकडे पाहून माझं हृदय अत्यंत तुटतं. विश्वासराव ! यानं माफी मागितली तर सोडतील कां हो याला ?

**विश्वास**--हें कुणी सांगावं ! बाकी त्याचा फायदा अवश्य होईल ! सरकारची तरी यांना उगीच कष्ट व्हावेत अशी थोडीच इच्छा आहे. पण ह्या आहेत, पुढच्या गोष्टी ! तूं तरी माझ्या हातांत--

**रामराव**--काकासाहेब, आपण मला वडिलांच्या ठिकाणीं आहांत. आपल्या भोळ्या मनाला भांबावल्या स्थितीनं असं कांहीं तरी सांगावं हा आपला दोष नव्हे. माफी मागण्याकरतां मी ही दीक्षा घेतली नाहीं. माफी मागणाऱ्या तोंडाला मोक्षाच्या मार्गावरून जाण्याला तोंड नसतं. माफीचा मार्ग मिळामिळीतपणाच्या मार्गावरून मृगजलाच्या प्रदेशाकडे जात असतो. माफीचा मंत्र शेवटीं मांत्रिकाच्या मानगुटीवर बसतो. माफी मागणारा मनुष्य केवळ मिंधेपणामुळें तसं करतो असं नाहीं. आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं माफी मागितली त्यांच्यांत सारे मिष्टान्नभाऊ होते असंहि नाहीं. पण माफीचं मोल देऊन माघार विकत घेतल्याचींच उदाहरणं जास्त आहेत. सत्याच्या साम्राज्यांत माफीला स्थान नाहीं ! मानी मनाला माफीचं वावडं आहे ! काकासाहेब ! मला आपल्या आज्ञेप्रमाणं वागतां येत नाहीं याबद्दल मात्र मी आपली माफी मागतों ! मला बालकाला क्षमा करा ! मी जें बोललों तें आपणांला उपदेश करावा या उद्देशानं नव्हे ! तसा माझा अधिकारहि नाहीं ! माझ्या मनाला जें सत्य वाटलं तेंच बोललों ! वहिनी मला आज्ञा द्या ! ( नमस्कार करितो. )

**रेवती**--भावोजी ! या बरं ! तुमच्या पुण्याईनं भारतमातेचें दैन्य धुवून जाईल ! भाग्याला भरती येईल ! सौख्याच्या सुधेचा वर्षाव होईल !

तुमची कीर्ति तरुण भारताच्या नवजीवनाला स्फूर्ति देईल व अंतीं भारतमातेच्या कपाळावर सूर्याच्या तेजाचा व चंद्राच्या शीतल शांतीचा टिळा लावला जाईल !

**रामराव**—दादासाहेब ! चला ! भारतमाते ! तुला माझा नमस्कार असो.

पद.

**मातृदेवि चरणिं हो प्रणती । हो कृतार्थ दास त्वदीय ॥ धृ० ॥ त्वद्यश जेथें विलसे । मूर्तिमंत दिव्य तें । जात तिथें मी सुमुदें । प्रिय तें, बहु मज, निज असुहुनि जनीं, सुखा न गणीं ॥ १ ॥**

( पडदा पडतो )

( अंक १ ला प्रवेश ३ रा समाप्त. )

---

# अंक १ ला–प्रवेश ४ था.

**स्थल—सरलेची खोली.**

पद.

**सरला—**

**खेळ प्रभू खेळे कैसा कुतुकमय । मति विचले, खेळे कैसा कुतकमय ॥ धृ० ॥ दैवास बोल ठेवितो । प्राणी खुळा जरा । तो वेगळाची नियमिता । सिद्धांत हा खरा ॥ १ ॥ कोणास केविं आकळे । लीला प्रभू करी । जग संभ्रमीं बुडे सदा । गहना गती खरी ॥ २ ॥**

कालचा दिवस ! माझ्या लग्नाकरतां ठरलेला दिवस ! दोन जिवांनीं देवाद्विजांच्या समक्ष मतैक्य आणि कार्यैक्याची शपथ घेण्याचा दिवस ! पाणीग्रहणाच्या वेळीं थरथरणाऱ्या अंगाच्या बिनबोलाच्या भाषेनें एकमेकांच्या हृदयांना मूक संदेश पोंचवून नव्या संसाराची नांदी म्हण-

ण्याचा दिवस ! आयुष्यांतला अननुभूत शुभ शकून दाखविणारा दिवस ! पुरुषार्थसाधनच्या प्रारंभाचा दिवस ! होय ! खराच तो कालचा दिवस तसचि होता पण–पण काय ? त्या दिवसाला देवाचं देणं द्यायचं होतं ! तिथी आणि मुहूर्त यांचं मेहूण दुसऱ्याच लग्नाला निघून गेलं ! त्यांचं लग्न झालं ! देवांनीं त्यांचं देशभक्तीशीं लग्न लावून टाकलं ! पिवळ्या देहानंच त्यांनीं सत्याची सात्विक मुंडावळ मस्तकावर बांधून शांतीच्या प्रखर अग्नीसमोर निश्चयाच्या बोहल्यावर आरोहण केलं ! लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या पवित्र पावलांनीं पुनित झालेल्या प्रदेशांत त्यांनीं पदार्पण केलं ! अहाहा ! असल्या पुण्याईच्या पर्वणीच्या वेळीं माझ्याकरितां त्यांनीं कांहीं संदेश सांगितला असेल काय ! होय तर ! सांगितला नाहीं तर काय ? पण मला ते काय म्हणून संदेश सांगतील ! सांगणार नाहींत ? असं कसं होईल ! मी त्यांची पत्नी ना ? धर्मे च अर्थे च–छे–! पण इथपर्यंत झालंच कुठं कांहीं ? मग ते माझे नव्हत व मी त्यांची नाहीं ! छे असं कसं होईल ! बाबांनीं ज्या दिवशीं मला त्यांना वाग्दत्त केली त्याच दिवशीं मी त्यांची झालें–अगबाई–मी आपल्याशींच केवढ्या मोठ्यानं बोलतें हीं ! मनांतल्या मनांतच मी अगदीं बोलतें अं ! रामराव अगबाई ! नांवदेखिल घेतलं की त्यांचं ? कां नाहीं घेणार ? सारं जग त्यांचं नांव घेत आहे आणि मला कांहीं अधिकारच नाहींच का ? मलाच तर सगळ्यांत जास्त अधिकार आहे. पण हिंदू स्त्रिया आपल्या नवऱ्याचं नांव कधीं घेतात काय ? वेडी, मी ! पण माझं लग्न नांवाशींच नाहीं कां झालं ! पण तें कांहीं निव्वळ नांवाचंच लग्न नाहीं हो ! अगदीं खरंखुरंच आहे ! मला ते आणि त्यांना मी असे अक्षयीं अखंड असूं.

पद.

**झालें मी तयांची । दासी । सप्त जन्म जन्मींची ॥ ध्रु० ॥ बांधि प्रभुच ही शुभ ग्रंथि दावी । दीव्या ज्योति सुखाची ॥ १ ॥ प्रेमें करूं सदा निज देशसेवा । मिळवूं जोड प्रभूची ॥ २ ॥**

पण—मी आतां काय करूं ! त्यांच्या मनाला आनंद द्यायला पाहिजे ना मी ? हो मग त्यांना आनंद कशानं होईल ! नांवाचा जय करीत बसल्यानं ? छे ग बाई ! मी आपली असा उगीच जय करीत बसलें आहें असं जर त्यांना कळलं तर—आणि त्यांना कळलंच कीं तें ! ते इथंच आहेत ना ? (हृदयावर हात ठेवून) मला त्यांच्यामागोमाग गेलंच पाहिजे! त्यांना दाखविलंच पाहिजे कीं मी त्यांच्यामागून मार्ग चालत आलें असलें तरी त्यांच्या थोडी पुढेंच आहें ! पुढें नसलें तरी त्यांच्या शेजारींच आहें. एवढं तरी नको का करायला मला ? झालाच माझा निश्चय ! त्यांच्या जागेवर काम करीन, चरका घेईन, खादी विणेन, विकेन, मला त्यांनीं सारंच शिकविलं आहे.

**पार्वतीबाई**—( रेवतीसह प्रवेश करून ) रेवु, तूं तरी सांग बाई हिला दोन गोष्टी ! कालपासून हिनं कसं अगदीं आमच्या तोंडचं पाणी पळवलं आहे !

**रेवती**—काकू ! काय म्हणते आहे तरी काय ही ! सरूताई ! काय कसला विचार चालला आहे अगदीं आपल्याशींच !

**सरला**—रेवूमाई, आज अगदीं या वेळींशा ?

**रेवती**—माझ्या प्रश्नाचं उत्तरच नाहीं, मी विचारीत होतं कसला एवढा राजकारणाचा विचार चालला आहे अगदीं आपल्याशीं म्हणून ?

**सरला**—माई, खरं म्हणशील तर मी किनई खरोखरच राजकारणाचा विचार करीत होतें ! माझं आपलं भोळं राजकारण ! कुणाच्या तरी मागून जायचं एवढं समजतं मला ?

**पार्वतीबाई**—असलं वेड्यासारखं काय बोलतेस ग तूं ? तुला ग कसलं आहे राजकारण का काय तें ? आतांशा किनई रेवू ! ज्या त्या गोष्टींत आपलं राजकारणच बोकाळलेलं दिसतं आहे ! घरींदारीं आपलं तेंच ! मला तर बाई त्यांतलं कांहींच कळत नाहीं. हीच बघ, काल तें

तसं झाल्यापासून आपली अशी एकटीच कांहीं तरी विचार करीत असते! अशानं वेड लागायचं उगीच ! बाळ ! या मुहूर्तावर नाहीं झालं लग्न तर नाहीं ! आम्ही तुला कुंवारी का ठेवणार आहोंत ! पण तुम्ही आज-कालच्या पोरी किनई भारीच बाई अनिवार ! घोडनवऱ्या करायची मेली अलीकडे चाल पडली आहे ! त्यामुळं मुलींना काय न् मुलांना काय जसं कांहीं नवऱ्याचं किंवा नवरीचं वेडच लागतं ! नवीं थेरं आहेत हीं !

**सरला**—मी कांहीं लग्नाचा विचार करीत नव्हतें !

**पार्वती**—मग कसला ग एवढा विचार चालला होता कालपासनं ? जेव्हां पहावं तेव्हां खोलींत बसली आहे डोकीवर हात देऊन ? रेवु आम्हांला झालं तरी कळत नाहीं का कांहीं ? सांग बरं ! ते तिचे उसासे, अगदीं एकाच दिशेकडे टक लावून पहाणं, मधून मधून वर आकाशा-कडे नजर फेंकणं, डोळ्यांना पदर लावणं, हीं कशाचीं ग लक्षणं अस-तात ? काल रात्रीं आपली हट्टच घेऊन बसली कीं मला एक चरका आणून दे म्हणून. हेंच असेल नाहीं का हिचं राजकारण ! काय ग खूळ आहे हें चरक्याचं ? भारीच बाई पीक आलं आहे आतांशा याचं !

**रेवती**—द्याना आणून एक चरका तिला. नाहीं तरी तिच्या मनाला नको का विरंगुळा पडायला थोडासा ?

**पार्वती**—म्हणजे तूंदेखील हिच्यासारखी वेडी व्हायला लागलीस वाटतं ! अग ही का आतां त्या चरक्यावर सूत काढणार ? आमच्या ठकू मोलकरणीनं आणला आहे एक चरका, ती काढीत असते त्याच्या-वर सूत ! तिचं बरं आहे. तिला त्यावर थोडेसे पैसे मिळतात. गरीबाला मदत होते पण हिला काय करायचं आहे त्याचं ! हिला काय खायला कमी आहे का नेसायला वस्त्र नाहींत का कुणाचे काबाडकष्ट करा-यचे आहेत !

**सरला**—आई ! आज आपल्या देशांत गरीब आणि श्रीमंत हा

केवळ वरकरणी भेद मात्र राहिला आहे. पारतंत्र्याचा भयंकर चटका पोटाच्या चिंतेच्या अभावीं श्रीमंतांना लागत नसल्यामुळें गरीबांच्या आंगच्या चामडीनंच ही श्रीमंतांची चांदीची चौफेर चादर तयार झाली आहे, इकडे त्यांचं लक्ष जात नसतं. आई! श्रीमंतांचीं मोठीं पोटं गरीबांच्या ताटांतल्या भाकरीवर त्यांना उपाशीं ठेवून वाढविलेलीं असतात. आई, ईश्वरानं श्रीमंतांनाच केवळ पोटभर खायला निर्माण केलं नसून गरीबांनाहि त्या दीनं दयाळानं तोच हक्क दिलेला आहे? श्रीमंतीची अशी अधम वांटणी होऊनदेखील श्रीमंतांच्या भूकेची खाई न भरल्यामुळें या खवखवलेल्या गिधाडांनीं गरीबांनाच पूर्णपणें खाऊन टाकण्याचें मनांत आणल्यामुळेंच दीनांचा वाली श्रीकृष्ण महात्मा गांधीच्या रूपानं अवतरून त्यांनीं आपलं सुदर्शन चक्र चरक्याच्या रूपानं पाठवून दिलं आहे! या चक्रांत तारक शक्ती आहे. या गांवढळ दिसणाऱ्या गोपालाचं हें अस्त्र परावलंबनाच्या पापाच्या पर्वताचा भेद करण्याइतकं प्रखर आहे. या एवढ्याशा वस्तूंत पाशवी पराक्रमाच्या पोटांत शिरून त्याचं सारं अंतःकरण उघडं करून दाखविण्याचं सामर्थ्य आहे! आई! याची योग्यता वर्णन करणं माझ्या आंवाक्याबाहेर आहे!

### पद.

**मोल चरक्याचें या, नवचे, हा अनमोल। मोही मनाला, दे शांति ताला, संगित बोले बोल ॥ धृ० ॥ मृदु मृदु मधुस्वन, नव्हे; प्रभुच तो गुंजे अविरत निज संदेशा, हत दैवासी खोल ॥ १ ॥**

**पार्वती**—रेवु! बाई! बाई! हिनं काय ग सांगितलं आतां एवढं? मला बाई, खरंच सांगते. त्यांतलं कांहींच समजलं नाहीं. श्रीकृष्णाचं सुदर्शन म्हणते नाहीं का ही त्या चरक्याला! तुह्मी शिकलेल्या मुली अशा बेताल व्हायला का शाळांतून जात असतां? मी इतकीं कृष्णाचीं

चित्रं पाहिलीं मला नाहीं दिसला तुमचा चरखा कधीं त्याच्या हातांत? मी हरीविजय वाचतें कधीं चरखा नाहीं आला ग त्यांत? कां श्रीधरांच्या पेक्षाँहि तुह्मी आतांच्या शाळेंत जाणाऱ्या मुली शहाण्या आहांत! उचलली जीभ नी लावली टाळ्याला! सरले! आह्मी तुझ्यासारख्या इंग्रजी शिकलेल्या नाहीं ह्मणून आह्मांला कांहीं ज्ञानच नाहीं असं कां तुझं ह्मणणं आहे? मी तिकडे ह्मणत होतें कीं नका पाठवूं हिला त्या शाळेंत! मेले सारेच लबाड! दुसऱ्यांच्या मुलींना भलतं सलतं काहीं तरी शिकवतात झालं! आतां हेंच एक निघालं आहे खूळ! राजकारण ह्मणजे खूळच असेल तर करा ह्मणावं ज्यांना करायचं असेल तें! उगीच दुसऱ्यांच्या पोरांना कां वेड्यावांकड्या मार्गाला लावतां? गरीब बिचारा रामराव! फसला ना या असल्या खुळानं! झाली कीं नाहीं अब्रूची वाताहात? चांगला वकीली पास झाला असता—जज्जाची जागा ह्मणे मिळणार होती त्याला—लग्न झालं असतं, दोन पोरं बाळं झाली असती; सुखानं रहायचं सोडून त्याला हे असले भ्रमिष्टासारखे डोहाळे आठवले नि करून घेतला सत्यानाश!

**रेवती**—काकू! आह्मी मुलींनीं तुह्मांला ज्ञान शिकवावं असं कांहीं नाहीं! तुह्मी हल्लीच्या शिक्षणासंबंधानं उगीच आपली गैरसमजूत करून घेतली आहे झालं! सरूताईचं म्हणणं खरं आहे! चरका म्हणजे खरंच श्रीकृष्णाचें सुदर्शन आहे. तें तुमच्या हरिविजयांत नसेल कदाचित् पण तें तेंच आहे. तें कसें तेंच मी सांगतें! पूर्वी आपल्या देशांत चरके होते कीं नाहीं?

**पार्वती**—होते; बरं मग? पण श्रीमंताच्या घरीं कुठं नव्हता चरका कधीं?

**रेवती**—तें मला कबूल आहे; पण त्या वेळेला गरीबांची आजच्या सारखी उपासमार होत नव्हती ना? आज असं कां व्हायला लागलं याच्या उत्तरांत सगळं कांहीं आहे! काकू! आम्हां मुलींला क्षमा करा!

आम्हांला जें कांहीं आमच्या फायद्याचं आज समजायला लागलं हा आमच्या शिक्षणाचा परिणाम बरं! पूर्वीं आमच्या या चरक्यावर असं बारीक तलम सूत निघत असे कीं विलायतच्या स्त्रिया तें कापड मोठ्या हौसेनं वापरीत; पण आमच्या त्या कलेची चोरी झाली आणि आमच्या चरक्यांना व मागांना बंद पाडण्याचे प्रयत्न तिकडे व्हायला लागले! तिकडनं कापड यायला लागलं; नानातऱ्हेच्या बऱ्यावाईट युक्त्या योजून तिकडच्या व्यापाऱ्यांनीं आपला व्यापार इथं थाटला आणि हळूहळू आमच्या येथल्या चरक्यांचा व मागांचा व्यापार संपुष्टांत आला! आमचं स्वातंत्र्य नष्ट व्हायला व आमच्या डोळ्यांत ही व्यापारी धूळ जायला एकच गांठ पडली! काकू! आजला अशी स्थिती झाली आहे कीं कोट्यावधि वार कापड विलायतेहून येथें येतं व त्याच्या बदली आमचे कोट्यावधि रुपये तिकडे जातात! धंदा गेला, बाहेरचें कापड स्वस्त मिळायला लागलं, आमचे लोक तेंच घ्यायला लागले! अशीं हीं सारीं अवलक्षणं सुचल्याबरोबर मजुरीवांचून आमच्या गरीबलोकांना दुसरा रोजगार उरला नाहीं!

**पार्वती**—खरंच कां ग हें? कुठं ग शिकलीस एवढं ज्ञान?

**सरला**—हें सारं किनई हिला विश्वासदादानीं शिकवलं बरं!

**रेवती**—नाहीं हो काकू! ही कांहीं तरी सांगते आपलं! तिकडे सरकारी नोकरी आहे त्यांतुन पोलिसांतली नोकरी ती! एक शब्दसुद्धां उच्चारायची चोरी!

**सरला**—आणि दादानीं तुझ्या देव्हाऱ्यांत लोकमान्यांचा आणि महात्माजींचा फोटो ठेविला आहे तो त्याच भीतीनं वाटतं!

**रेवती**—सरूताई! मोठ्यानं बोलूं नका गडे! मोठा काळ कठीण आला आहे बाई आतांशां! तिकडेसुद्धां देशहिताची तळमळ कांहीं कमी नाहीं पण करायचं काय हें पोट येतं ना आडवं?

**पार्वती**—मग तुम्ही कां ग घेत नाहीं चरका ! मोठींग बोलघेवडीं आह्मांत तुम्ही ? पूर्वींहि चरका गरीबांच्याच घरीं असे आणि आतांहि तो त्यांनींच घ्यावा ! सूत काढावं नी दोन पैसे मिळवावे ! मजूरी करण्यापक्षां तें बरं हें ठीक आहे ! आणि त्यांनीं विणावंहि थोडं थोडं.

**रेवती**—आणि काकू ! सरूताई तरी जवळ जवळ तेंच म्हणत होती ! प्रत्येकाला आपापली गरज भागवितां आली, कीं आयताच बाहेर जाणाऱ्या पैशाला आळा बसला ! याचंच नांव " स्वदेशीव्रत. " आतां गरीबांनीं चार पैसे देशांतल्या देशांत रहायची सोय केली तर श्रीमंतांनीं आपले चार रुपये देशांत ठेवण्याची सोय करायची म्हणून सर्वांनीं आपापल्यापरी चरका चालवून खादी विणून तीच वापरली पाहिजे.

## पद.

**खरें श्रेष्ठ माना । सदा या व्रता । वरावें, जपावें, खपावें स्वतां ॥ धृ० ॥ शुद्ध विचारें । शुद्धाचारें । विशुद्धतेचा विजय वावरे, भुवीं या, तपें या मिळे योग्यता ॥ १ ॥**

**पार्वती**—आतां कळलं ग मला सारं हें तुमचं राजकारण ! खरंच बाई असं झालं म्हणजे गरीब श्रीमंत हा भेद जरी गेला नाहीं तरी सारेच आनंदांत राहतील हें मात्र खरं आहे !

**रेवती**—आणि सर्वांच्या सुखाकारितांच ना श्रीकृष्णाचं सुदर्शन होतं ? आतां सांगा बरं चरका म्हणजे देवाचं सुदर्शन कीं नाहीं तें ? मग काकू ! आणून देतांना सरूताईला एक चरका ?

**पार्वती**—अगदीं आजच तिकडे सांगून आणवतें हो ! आणि एक मीहि आणवतें आपल्याकरितां ! एरवीं रिकामपणाचा वेळहि जाईल नी त म्हणतेस तें पुण्यहि लाधेल !

**सरला**—आई ! श्रीकृष्णाचं सुदर्शन हातीं घेतलं म्हणजे तें व्रत जन्मभर चालवायचं असतं हो ! नाहीं तर देव रागावेल ! आतां तुला खादीचीं पातळं नेसावीं लागतील !

**पार्वती**—सरू, गरीबांना त्यानं आनंदांत राहतां येईल, ईश्वराची कृपा होईल असं जर तुम्ही म्हणतां तर खादीचं पातळ मला नेसायला काय हरकत आहे! तुम्ही म्हणाल तर जन्मभर तेंच नेसेन. तिकडेसुद्धां मी सांगेन कीं तुमचे कपडे सारे खादीचेच करा म्हणून ! मी काढीन सूत त्यांच्या कपड्याकरितां !

**सरला**—मग एकदां म्हणतेस का "महात्मा गांधीकी जय" "लोकमान्य बाल गंगाधर टिळककी जय" "वंदे मातरम्" !

( सर्वजण जयजयकार करितात. )

अंक १ ला प्रवेश ४ था समाप्त.

पडदा पडतो.

---

# अंक १ ला–प्रवेश ५ वा.

( रावबहादुर विचारे प्रवेश करितात. ) ( रावबहादुरांचा दिवाणखाना. )

**रावबहादुर**—( स्वतःशीं ) अखेरीस मला ज्याचं भय वाटत होतं तेंच पुढें दत्त म्हणून उभं राहिलं ! रामरावाला मुलगी देऊन स्नेह्याच्या वचनाच्या ऋणांतून मुक्त होण्याच्या अगदीं आयत्या वेळीं दुर्दैवानं हा असा घाला घातला. आजच्या ताज्या तरुणांच्या तरतरीत मेंदूवर तपस्वितेची तांबडी छाया पडून "देहं वा पातयेत् कार्यं वा साधयेत्" हा धगधगीत धीराचा बाणा बाळगायला लावणं हा आजच्या काळाकडे पाहून शुभ शकुन समजूं, का मायावी मोहजालांत सांपडून मरणाची तयारी करण्यास मन मोकळेपणानें निघालेल्या या पोरांना मूर्ख समजून

आत्मनाशाबरोबर देश नाश करायला तयार झालेले माथेफिरुं म्हणूं ? याला मानवी मनाची मनोहर उत्क्रांति म्हणूं का विश्वाच्या विशाल आखाड्यांत तमाशाकरितां उतरलेली कावेबाजी म्हणून नांव देऊं ! या चळवळीच्या डाव्या उजव्या बाजूंवर मी बराच विचार केला आहे तरी पण तिचा थांग मला अजूनहि लागलेला नाहीं. उत्पादकाचें उज्वल चारित्र्य उत्तेजक आहे पण अज्ञानी अनुयायांचा आततायीपणा त्यावर विरजण घालतो. ( विचार करून ) माझ्या वरच्या आजच्या परिस्थिती-बद्दल कोणाला जबाबदार धरावं हें माझ्यासारख्या वकीलीच्या धंद्यांत मुरलेल्या माणसालाहि ठरवितां येत नाहीं मग साधारणांची काय कथा ! असो ! मर्जी ईश्वराची ! भविष्य काळाचं भाकित काय असेल व जगाला आणखी काय चमत्कार पहायला मिळतील याची काव्यमय कल्पना प्रसवणारी ही कदाचित् काळाची प्रतिभा असेल !

## पद.

**गूढ अति भासते, ईशलीलाच ही ।**
**झालि अभिनव जवें जागृता ही मही ॥ धृ० ॥**
**शांतिरस वाहवी, शक्तिका शांभवी ।**
**बोध मुळिं होइना, बुद्धि हो गुंग-ही ॥ १ ॥**

( पार्वतीबाई सरलेसह प्रवेश करितात. )

ऐकलंत का ? ही कसला हट्ट घेऊन बसली आहे तें ? बाई बाई ! बावचळल्या की ह्या पोरी !

**रावब०**—काय झालं आहे काय आणखी नवीन ? पोरीला अशी हिडिस फिडिस कां करतेस. तिचा हात धरून असं अगदीं फरपटत कां आणलं आहेस ?

**पार्वती**—बाई ! बाई ! मी तिला हिडीस फिडीस काय म्हणून करीन ? ती का माझी पोर नव्हे ? एकुलती एक सोन्यासारखी पोर तिला

माझ्या जीवाच्या जीवाला मी हिडिस फिडिस करेन असं खरंच वाटतं कां इकडं ?

रावब०—आपल्या एकंदर आविर्भावावरून तसा अंदाज केला. चुकलों असल्यास मला त्यांत संतोषच आहे ! काय केलं आहे तिनं ? दुःखभारानें जड झालेलं अंतःकरण कदाचित् मोकळेपणानं वावरायला मागत असेल ! दुःखी मनुष्य क्वचित् प्रसंगीं लहान मुलापेक्षांहि जास्त बालिशपणा करतांना आढळतो पण त्याच्या मनाच्या स्थितीकडे पाहून त्याची कींवच करायला हवी ! सरले, काय झालं बाळ ?

सरला—( गंभीरपणानं ) बाबा ! मी तुम्हांला काय सांगूं ! माझ्या मनाची अवस्था मनमोकळेपणानं मी तुम्हांला सांगू का ? माझ्या मानसिक अवस्थेची परमावधि माझ्या ध्येयाच्या कोणत्या मोहनताऱ्यावर खिळलेली आहे हे मी तुम्हांला कळवूं कां ? अगदीं ओंठाजवळ आलेला पत्नीपदाचा अमृतप्याला दानवी दैवानं माझ्यापासून हिरावून घेतला म्हणून प्राणापेक्षांहि मजवर प्रेम करणाऱ्या माझ्या मातापितरांना विनाकारण दुःख देण्याचें प्राणघातक पातक माझ्याकडनं घडेल असं आपणांला वाटत नाहीं ना ?

## पद.

पाप हें घडेना, हातें या, कदाकाळीं, जाणा ॥ ध्रु० ॥
जननिताता । असुखाची देतां कसें, सौख्य होइ मज,
परी, माव निराळी माना ॥ १ ॥

आईच्या अमर्याद अपत्य प्रेमाला दुखविण्याची दुष्ट मनोवृत्ति माझ्या हृदयांत उत्पन्न करणें दुर्निवार दुःखालाहि शक्य नाहीं ! आईच्या भाळ्या मनाला माझी भाविक वृत्ति कळली नाहीं हा तिचा दोष नव्हे.

रावब०—(स्वगत ) पोरीचं लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं ! हिच्या



विश्वासराव०–आपण इतके गांधीभक्त असाल अशी माझी कल्पना सुद्धां नव्हती !

[ अंक २ प्र० १ पृष्ठ ३०.

तोंडावरची ही सात्विक गांभीर्याची छाया ध्येयप्राप्तीच्या धांवत्या वातावरणांत हिला ओढीत आहे हेंच खास !

**पार्वती**—काय? एवढा काय विचार चालला आहे असा ? हिला दोन गोष्टी सांगायचं सोडून स्वतःच धीर सोडलात् तर कसं होईल ? हिच्या मनोवृत्तीच्या बेफामपणाची कल्पना तरी झाली का इकडे ? हट्टीपणाला तरी ताळतंत्र असावं लागतं हो ! हें मेलं एक नवंच वेड निघालंय आतांशा ? एवढीं मोठमोठालीं डोकीं जमतात म्हणे एके ठिकाणीं आणि ते सारे मेले घरांत बसून कोंवळया पोरांना वाटतील तसे हट्टी हुकूम सोडून त्यांना सर्वस्वी नागवतात. तें मेलं खादीचं नि चरक्याचंच घेतलं वेड कधींपासनं. देवाचंच नांव घेतलं म्हणून ऐकलं हिचं मी नि—हीं खादीचीं पातळं नेसायला लागलें. चरक्यावर सूतहि काढायला लागलें आणि ही म्हणेल तर विणेनसुद्धां ! त्यांत कांहीं कठीण नाहीं आणि देवाची व देशाची सेवा होते म्हणे त्यानं, तेव्हां ह्मटलं उगीच कशाला पोरीचं मन दुखवावं ? पण ही आपली लागली हळू हळू शिवराळपणा करायला ! आतां काय ह्मणते—कायग सांग काय ह्मणाली होतीस तें ! मला नाहीं बाई आठवत तो शब्द !

**रावब०**—समजलं ! आपण कशाला आतां या वयांत शब्द पाठ करण्याचे श्रम घेतां? कळेलच मला तें हळू हळू ! तिला जरा अंमळ शांत मनानं सांगून तर द्या ! आपल्या या लेक्चरामुळें तिला बोलायला सवडच कशी ती मिळाली नाहीं !

**पार्वती**—हो ! मी कशाला देऊं बाई लिक्चरं कां फिक्चरं ! बाकी साऱ्या मेल्या बोलघेवड्यांच्या लेक्चरांनींच तर इच्या डोक्यांत हें वेड भरलं ! मला नाहीं देता येत तसलीं लेक्चरं कोणाला सर्वस्वी नाडण्याची ?

**राव ब०**—खुळी आहेस झालं ? देशांतले विद्वान पुढारी ह्मणजे लोकांचे शत्रू आहेत असं कां तूं समजतेस ?

**पार्वती**—तसं नाहीं तर काय समजूं ? नसतीं थेरं उभीं करताहेत तीं कां स्वर्गांतून खालीं आलींत ! हीं हजारों माणसं कैदेंत जाताहेत तीं कुणाच्या सांगण्यावरनं ? जातो का मेला एकादा वटवट्या त्यांच्या बरोबर ! माझ्या भोळ्या बाळीवर भुरळ घातलीन् मेल्यांनीं ! काल संध्याकाळीं घरोघर उन्हांतान्हांतून खादीचीं गोणपाटं विकून आली. थोरा मोठ्यांच्या मुलामुलींना असलीं मजूरासारखीं कामं करायला सांगून राहिलेल्या पैशाचं हे मेले काय करणार आहेत हरी जाणे ! ( सरलेच्या जवळ जाऊन ) घामानं माझ्या बाळीचं सारं तोंड कसं डबडबून गेलं होतं ! मोटारसुद्धां घेतली नाहीं त्या दारोदार हिंडण्याकरतां ! मी ह्मणत होतें खादी विकायची तर वीक पण गाडींतून तरी जा ! पण ( रडत ) ती कशाला ऐकायची आमचं ! आह्मी जसें कांहीं तिला परके झालों ! आमचं काळिज तुटतं पण त्याच्या वेदना हिला कशा कळणार ! दोन पोरं झालींन् तीं अशीं उन्हांतान्हांतून जायला लागलीं ह्मणजे मग येईल आईची आठवण ? नाहीं ग बाई मी जाऊं द्यायची माझ्या बाळीला तसल्या संकटांत उडी घालायला ?

**रावब०**—अग पण ती काय ह्मणते तें तर ऐकूं दे, सरल ! काय करायचं आहे तुझ्या मनांतून ?

**सरला.**—बाबा ! आई ! तुमच्या निरेपक्ष प्रेमळ मनाला दुःख द्यायचं सुखासुखी माझ्या मनानं घेतलं आहे असं कां आपणांला वाटतं ? बाबा ! माझ्या मनांतून काय करायचं आहे हें न ऐकतांच नाहीं कां आपल्या ध्यानांत आलं ? बाबा ? आजच्या अजब भाग्यवान् कालाकडे आपलं लक्ष नाहीं असं मी कसं ह्मणूं ? देशाच्या दुःखाच्या आंचेनं होरपळणाऱ्या तुमच्या हृदयानं कैक प्रसंगीं बाहेर काढलेले शब्द व शक्तीप्रमाणें त्याकरितां तुम्ही करीत असलेले प्रयत्न मला समजूं लागल्यापासून माझ्या स्मरणांत आहेत ! पण बाबा, आपला काळ मागें पडला असून आतां " नवा काळ " सुरुं झाला आहे. जुन्या जर्जर रुढीला " नवजीवन " पाजून तिला नवा जोम आणण्यांत आला आहे !

राजसी किंवा तामसी वृत्तीचा नायनाट करून तिच्या ठिकाणीं शुद्ध, सात्विक आणि सतेज अशी वृत्ती तयार होऊं लागली असून त्या तेजाची तप्त मुद्रा धारण करणारे हजारों तरुण वीर आज देशांत वावरूं लागले आहेत! भगवंताचा नवा अवतार नुकताच झाला असून त्यानं आपलं तेज चहुंकडे विखरून दिलं आहे, त्यामुळें निशाचरांच्या हृदयाला धडकी भरण्याची वेळ आली असून भारतमाता नवचैतन्याच्या चंद्रप्रकाशांत सात्विक आनंदानं हास्य करीत आहे ! फारा दिवसांची कष्टी झालेली, अनेक वेळां काळाच्या कठोर प्रहारानं जर्जर झालेली, व आपल्या तेजस्वी अपत्यांच्या निधनदुःखानं भाजून निघालेली भूमाता या वेळीं भगवंतानं आपल्या चहूं भुजांनीं उठवून बसविली आहे. सूर्यनारायणानं अस्तास जातां जातां आपल्या सुवर्णमय किरणांनीं गाळून बनविलेली मोहनमाळ तिच्या लवकरच येणाऱ्या भाऊबीजेला देण्याकरितां देवानं उद्योगदेवता महालक्ष्मीकडे जोमाच्या जरतारींत गुंफायला पाठविली आहे ! असा हा भाग्यवान् काळ पहाणारे आपण भाग्यवान् तर खरेच, पण या भाग्यानं चालून आलेल्या काळांत आपणहि भाग घ्यायला विसरून चालायचं नाहीं ! स्वराज्यमार्गावरील चोरवाटा आतां बंद झाल्या असून चढत्या चढावाची चढण चढण्याकरितां चिरंजीव पद पावलेल्या महात्म्यांनीं "सत्याग्रहाचं निशाण" उभारलेलं आहे! बाबा मी सत्याग्रहाला जाणार ! मी मुळशीला जाणार ! मला परवानगी द्या !

**पार्वती**—ऐकलंत ?

**रावब०**—बाळ ! ही असली ही आत्यंतिक पायरी आतांच ओलांडली नाहीं तर नाहीं का चालणार !

## पद.

**ऐके माझे । वेल्हाळे राजस बाळे ॥ धृ० ॥**
**दिव्यत्वीं तव मानसहंसें । क्रीडन कुतुकें तें**
**केलेसें । मन्मानिं परि ती जडता भासे ।**
**नको त्यजुं । गमे मिटतिल मम हे डोळे ॥ १ ॥ ०**

एकाद्या पंडिताप्रमाणं प्रगल्भ झालेल्या तुझ्या बुद्धीवर वजन पाडण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं! माझं तुला एवढंच सांगणं आहे कीं तुझ्या जाण्यानं तुझी आईबापें दुःखभारानं वांकून जातील! बाळ! (स्फुंदत) ज्या जगांत तुझं कौतुक होईल त्याच जगांत तुझ्या होणाऱ्या काबाडकष्टांची कल्पना करीत आह्मी अश्रु ढाळीत बसावं हें दृश्य तुला दिसत नाहीं का? देश-सेवा करूं नको असं आमचं ह्मणणं नाहीं! केवळ खादीच्या बाजूचाच तूं पुरस्कार कर; त्यांतहि तुझं कल्याण आहे, देशभक्ती आहे सर्व कांहीं आहे! वाटलं तर खादभिंडार काढ, नाहीं तर चरकाभवन स्थापन कर. लागेल तेवढा पैसा घे, पण—

(डोळ्यास पदर लावतात.)

**पार्वती**—सरल! सरू! नको ग जाऊंस आम्हांला टाकून! तिकडचं म्हणणं ऐकलंस तर कल्याण होईल! माझी बाळी ती! आमचं नसेल ऐकायचं तर (रडत) आम्हांला आपल्या हातानं मारून तरी टाक नि मग जा! देवा! माझ्या सुकुमार बाळीचे हाल व्हावेत असं तुलाच वाटतं कां! माझ्या या सोन्यासारख्या सुंदर मुलीची तुला दया येऊं दे रे! नाहीं जाऊं द्यायची मी माझ्या सोनुलीला! (तिला हृदयाशीं धरून रडते.)

**सरला**—देवा! मोठा कठीण प्रसंग आणला आहेस तूं माझ्यावर! जन्मदात्या आईबापांना अशा प्रसंगीं दुःख देण्याचं पातक मला लागेल काय? या वेळीं देवा तूंच मला मार्ग दाखीव! मी अत्यंत गोंधळून गेलें आहे! मस्तक भ्रमण करायला लागलें आहे. माझ्या पायांखालची भुई हालायला लागली आहेसें वाटतं! भगवंता! मी आतां काय करूं! भारतमाते!—(मूर्छित होते.)

पडदा पडतो.

**अंक १ ला समाप्त.**

# अंक २ रा.—प्र. १ ला.

( स्थळ—रावसाहेबांचें घर )

**रावसा०**—हा गांधी ह्मणजे आजच्या जगांतली एक अजब चीज आहे. केवळ कल्पनासृष्टींतल्या काव्यानं मोहून जाऊन आपल्या मनःसृष्टींतल्या कल्पनिक ध्येयांना हा जगभर स्वैर संचार करायला लावतो आहे. खरोखर गांधी जर नुसता तत्ववेत्ता ह्मणून जगापुढं आला असता तर मोठमोठ्या तत्ववेत्यांच्या मालिकेंत त्याला जागा देतां आली असती. एखाद्या अर्धवेड्या कविमंडळाचं अध्यक्षस्थान देण्याविरुद्ध माझी खात्री आहे, कोणीहि एक चकार शब्द काढला नसता. पण नसता उपद्व्याप करून यानं राजकारणांत उडी घेतली व जड राजकारणाशीं आपल्या भ्रमोत्पादक कल्पनेचं लग्न लावून दिलं. अशी ही गडबड जर यानं केली नसती तर देशांत याच्या नांवाच्या पोकळ शांतीच्या उपदेशापेक्षां किती तरी पट शांति नांदली असती. भल्या माणसा! तूं हें कठीण काम सोडून दे व कोठें तरी हिमालयाच्या एखाद्या खबदाडांत बसून तत्वज्ञानाचे ग्रंथ लिहीत बैस असं हडसून खडसून सांगून टाकावं असं ही माझ्या मनांत आलं पण या जगांत आतां बोलण्याचीं सोयच राहिली नाहीं. गांधीशीं मतभेद ह्मणजे ब्रह्महत्या अशी स्थिति झाली आहे. कसाहि असो इतकं मात्र मी छातीठोकपणानं सांगेन की गांधी एक अलौकिक महात्मा आहे. 'महात्मा गांधी!' शोभतं त्याला हें नांव! त्याच्या दृष्टीक्षेपाबरोबर हुकमाची वाट पहाणारे सारेच बावळट खास नाहींत. त्यांची ती "महात्मा गांधीकी जय" ही गर्जना, मी अगदीं खरंच सांगतों, कानाला मोठी गोड वाटते व मींहि त्याच्या निर्मलतेकडे पाहून मनाशींच केव्हां केव्हां ह्मणतों "महात्मा गांधीकी जय."

( विश्वासराव येतात. )

**विश्वास०**—नमस्कार रावसाहेब ! मोठमोठ्यानं आज अगदीं गांधींचा जयघोष चालविला आहे ! आपण इतके गांधीभक्त असाल अशी माझी कल्पनासुद्धां नव्हती !

**रावसा०**—(स्व.) ऐकलं वाटतं ! (उघड) हें पहा दादासाहेब ! देशांतल्या या चळवळीकडे व तिच्यामुळं होत असलेल्या हजारों दंग्याधोप्याकडे पाहिलं म्हणजे या चळवळीवर विचार करण्याची साहजीकच इच्छा होणार व त्याबरोबर गांधीचं नांवहि येणारच ?

**विश्वास०**—पण त्याबरोबरच हा जयजयकारहि आला पाहिजे असं नाहीं ? आपल्या मनानं जर या अनवस्थेला गांधीच कारण आहेत तर त्यांतून असला मोकळ्या मनाचा प्रेमळ जयजयकार कसा निघतो सांगा पाहूं ? मी आपणांला खरंच प्रेमानं विचारतों.

**रावसा०**—दादासाहेब ! जाऊं द्या हो एवढ्या बारकाईच्या बाबी ! धन्य आहे बुवा तुमची ! तुम्ही न्यायशास्त्र वाचलं आहेसं दिसतं. नाहीं तर हा असा बारीक मुद्दा तुम्हीं काढलाच नसता. हो, सगळेच पोलिस नसतात कांहीं असे चाणाक्ष !

**विश्वास०** —रावसाहेब ! मी तुमचं तें जुनं न्यायशास्त्र वाचलं नसलं तरी न्यायाचा एक छोटासा संरक्षक म्हणून तर माझी योग्यता तुम्ही कबूल करतां कां नाहीं ! अशी कल्पना करा कीं उद्यां आपल्याच कोर्टांत मी एखादा बालिश मुद्दा पुढें आणला तर आपण मला काय म्हणाल ?

**रावसा०**—खरं विचाराल तर तुम्ही अगदीं आपल्या धंद्यांत एक उत्तम शिफारसपत्र देण्याजोगे इसम आहांत असंच मी ह्मणेन. अहो हा पिनलकोड म्हणजे एक मौज आहे झालं ! त्याला फार कांटेकोरपणा खपतच नाहीं ! असा मोकळा कायदा, अगदीं सर्वांना लागलाच समजणारा कायदा आजंपर्यंत मुळींच झाला नाहीं असं माझं

ठाम मत आहे ! वास्तविक मी तर म्हणतों कीं त्या कायद्यांच्या कलमांचा अर्थ करण्याकारितां मुळीं वकीलांची जरूरच नाहीं !

**दादासा०**—( हंसून ) अरे वा ! रावसाहेब ! वकीलांची क्रिमिनल कोर्टांतली प्रॅक्टीस बुडाविण्याचा तुम्ही अगदीं विचारच केलेला दिसतो ! एकूण तुम्ही मघां जो गांधीचा जयजयकार केला तो अगदीं अंतःकरणापासूनच होता यांत संशय नाहीं. अहो वकीलांनीं वकीली सोडावी, हें गांधीचं मुख्य तत्व—ना ! त्यांतलं निदान फौजदारी कोर्टापुरतं तरी तुम्हांला पटलं आहेसं दिसतं ! मला खरोखर तुमची ही गांधीभक्ती मनापासून आवडते ! भारी गोडी आहे बुवा या तुमच्या कल्पनेंत !

**रावसा०**—छे ! छे ! तसंच नाहीं कांहीं अगदीं ! [ हंसून ] मला तुम्ही पक्का गांधीभक्त समजतां एकूण ! समजा वाटलं तर, पण मी तुम्हांला खरंच सांगतों मला गांधींची मोकळी वृत्ति भारी आवडते ! आमच्या गोखल्यांचे शिष्य म्हणविण्यांत ज्यांना भूषण वाटतं त्यांच्यावर आमच्या सारख्यांची भक्ती असण्यांत काय वावगं आहे सांगा पाहूं ? परवां म्याजिस्ट्रेटनीं शिक्षा सुनावतांना गांधीच्याबद्दल काय उद्गार काढले ते तुमच्या ध्यानांत नाहींत वाटतं ? तुम्हांला वाटलं तर नोट करा कीं, मी म्हणतों, गांधी एक अलौकिक विभूती आहे, मानवी देहांत प्रत्यक्ष महादेव आहे !

**विश्वास**—मग त्यांच्या म्हणण्याप्रमाणं वागण्याचं कसं आपल्याकडून होत नाहीं ? स्पेशल अधिकारांच्या सारख्या वर्षावानं फोंफावलेली ही म्याजिस्ट्रेटी, हें रावसाहेबाचं पदवीदान, पुढें येणारी रावबहादुरी अगर सरकी ह्या सगळ्यांना कां नाहीं देत रजा ?

**रावसा०**—( मॅजिस्ट्रेटी आविर्भावानं ) हें पहा दादासाहेब ! हें आपण विचारूं नये व मी सांगूंहि नये ! मी केवळ अंधभक्त नाहीं एवढं सांगितलं म्हणजे आपणांला कळेल ! गांधीचा मी एक स्तुतीपाठक आहे

अशी मात्र आपण कल्पना करूं नका ! अहो, मलासुद्धां कांहीं स्वतंत्र मतं आहेत असें आपणांला वाटतं ना ! साखर गोड असली म्हणून नुसती साखरच कोणी खातो काय ? तिच्यांत कांहीं मिश्रण करून नंतर त्याचा आपल्या आवडीचा नवा पदार्थ बनवायचा व तो खायचा असा व्यवहार आहेना ! मग व्यवहारांत गांधी जिथं घसरतात तिथं माझा त्यांचा मतभेद आहे !

( टेलिफोनची घंटा होते. )

**विश्वास**—मी जाऊं काय टेलिफोनवर ? कुणी हाक मारतं आहे !

**रावसा०**—नको नको ! मीच घेतों मेसेज ! (टेलिफोनवर मेसेज घेतात.) हॅलो ! कोण बोलत आहे ? मी भाद्वे ! बरं ! हं ! हं ?—( दुःखानं ) [ विश्वासरावाजवळ येऊन ] दादासाहेब ! मला वाटतं भगवंताला माझी पुरीच परिक्षा पहावयाची आहे !

**विश्वास०**—काय झालं ? मेसेजमध्यें कांहीं वाईट वार्ता आहे कीं काय?

**रावसा०**—दादासाहेब ! मि. बॅकसिल्व्हरकडे अतीशय काम असल्यामुळें Emperor Versus Ramrao हा खटला माझ्या कोर्टांत चालेल असा हुकूम आला आहे ! ( संतापानें ) या गांधींचं हेंच मला पटत नाहीं ? सारीं तरुण कार्टीं त्याच्या नादीं लागलीं व आपल्या आयुष्याचा नाश करून घेतला गाढवांनीं ! देशांत दंग्यावर दंगे होताहेत व हें जर असेंच चालूं राहिलं तर शांतीचं ठाणं इथून उठलंच ! या असल्या माणसांना सरकार बिनचौकशीनं हद्दपार तरी कां करीत नाहीं !

**विश्वास०**—रावसाहेब ! हल्लीं गांधीजी तुरुंगांतच आहेत ना ? त्यांना चांगली सहा वर्षांची शिक्षा झाली आहे?पण आपली गांधीभक्ती इतक्यांतच—

**रावसा०**—दादासाहेब ! माझा रामराव किती गोड पोरगा आहे तुम्हांला माहितच आहे ! सरसाहेबांच्या मृत्यूच्या वेळीं त्यानं माझ्या खांद्यावर डोकं ठेवून केलेला अश्रुपात मला अजूनहि ताजा वाटतो !

स्नेह्याचा मुलगा खरा पण त्याच्यावर माझं पोटच्या पोराप्रमाणं प्रेम आहे व त्या प्रेमाची परिक्षा पहाण्याचं परमेश्वरानं ठरविलं आहे कीं काय हें मला कळत नाहीं ! रामरावाला माझ्याच हातून शिक्षा व्हावी असाच दैवयोग असेल का हो ! दादासाहेब ! केस मजबूत आहे का ? चांगला बॅरिस्टर दिला तर— ( रागानं ) पण हें खटल्यांत मुळींच भाग न घेण्याचं खूळ माजलं आहेना ! द्या म्हणावं देशांतल्या तरुणांचे बळी विनाकारण ! हा गांधी साधू आहे पण भ्रमिष्ट आहे ! ( सचिंत )

**विश्वास०**—ही मोठीच जबाबदारी आपणांवर आली आहे रावसाहेब ! पण ती धैर्यानं पार पाडली पाहिजे. रामरावाच्या बचावाचा मार्ग जसा आतां आपल्या हातीं राहिला नाहीं तसाच तो माझ्याहि हातीं नाहीं. आपण जरा शांतपणानं यावर विचार करा म्हणजे सुचल्यास कांहीं तोड निघेल.

**रावसा०**—परिस्थिति बिनतोड आहे ! भगवंत ज्याप्रमाणं मार्ग दाखवील तसं करणं भाग आहे ! दादासाहेब ! आतां उशीर फार झाला आहे, आपण इकडेच फराळ कराना. रेवतीलाहि बोलाऊन घेतों पाहिजे तर इथंच.

**विश्वास०**—नको. ती विचाऱ्यांच्याकडेच आज राहणार आहे. मीहि तिकडेच जाणार होतों. हरकत नाहीं मला इथं फराळ करायला. टेलिफोनवरून कळवून देऊं त्यांना तिकडं म्हणजे झालं !

**रावसा०**—विचाऱ्यांची पोरहि अशीच या अर्धवटांच्या नादाला लागली ! भोजनोत्तर आपण तिकडेसच जाऊं. त्या पोरीलाहि दोन गोष्टी सांगायला हव्या. चला. ( जातात. )

( प्रवेश १ ला समाप्त. )

# अंक २ रा.–प्रवेश २ रा.

( रस्ता. )–( सरला व रेवती खादीचीं ठाणं घेऊन येतात. )

**सरला**– ( फेरीवाल्याच्या स्वरांत ) घ्या खादी ! स्वदेशी शुद्ध पवित्र खादी ! महात्मा गांधींचं पुण्यस्मरण ! स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नाचं सूत्रमय प्रतीक ! पारतंत्र्यानं गारठलेल्या शरीराला सात्विक ऊब देणारा एकमात्र विसांवा ! पुण्याईच्या साधनाचा पवित्र ओनामा ! बेफाम दौडत्या दिलावर शांतीची दैदिप्यमान दिलदारी स्थापन करून त्याला दुराचाराच्या दाबांतून ओढून काढणारा देवाघरचा दैवी संप्रदाय ! घ्या हो घ्या ! रेवू माई ! पुकारा सवाल. आज गांधीदिन. या पावन दिवशीं पुण्यपावन प्रभूच्या चरणीं आपली सेवा पुरेपूर रुजू झाली पाहिजे.

**रेवती**—सरूताई, तुझ्यासारखा मला सवाल पुकारतां येईल का ग ? तूं शिकविलेले रामदासी धर्तीचे ते श्लोक म्हणूं का मी ? ते मी अगदीं तोंडपाठच केले आहेत. सरूताई ! केवढं माझं भाग्य कीं मला तुझा पुण्यमय सहवास लाभला. तुझ्या दैवी तेजाच्या प्रभावामुळें मी तुझ्या पुण्याईची प्रजा झाल्यासारखं मला वाटायला लागलं आहे. मागचा पुढचा विचार न करितां माझ्या मनानं तुझ्या मागोमाग जाण्याचंच मनाशीं ठरविलं आहे ! मनाची मोकळी मिळकत अनेक तपांनंतर दीन दुनियेला आजच मिळायला लागली आहे असं वाटून देवाचं दयालुत्व दाही दिशांनीं तळपत आहेसं दिसत आहे. ताई, मला वाटतं, वेदांतानं या तुझ्या चेहऱ्याकडे पाहून विवेकवाणीच्या मंगल आरतीनं तुला ओंवाळावं व जगाला सांगावं कीं, जगा ! मानभावीपणा टाकून मनाच्या माहेरीं जाण्याकरितां या मंगलमूर्तीचं आराधन कर !

**सरला**—(हंसून) माई ! मला वाटतं या खादीच्या ठाणांतून तूं खरोखरच एखादी पंचारती दडवून आणली आहेस व या अशा चौरस्यावर मला ओंवाळूनहि घेणार आहेस ! मला वाटतं माझं आराधन बस्स झालं ! अशानं मी कदाचित् उद्यां महात्मा गांधींपेक्षांहि स्वत:ला श्रेष्ठ समजायला लागेन आणि नंतर—

**रेवती**—ताई ! तूं कांहींहि म्हण पण देवांत व त्याच्या खऱ्या भक्तांत मी तरी कांहीं भेद मानत नाहीं !

**सरला**—माई ! माझी राहिलेली स्तुति तूं किनई घरीं गेल्यानंतर उरकन घे ! आजच काम आपण प्रथम करूं या ! हं म्हण ते श्लोक !

**रेवती**—तुझ्या सहवासांत असंच तरी कांहीं होतं मला ! (श्लोक म्हणते.)

॥ श्लोक ॥

नको राघवा होउ दे खादि तूटी ।
जयें पाविजे मोक्ष स्वाराज्य भेटी ।
जना लाभलीसे जणूं कामधेनू ।
सुखा सात्विकाची खनी कोंवि वानूं ॥ १ ॥
जुनी संस्कृती लोपली मायदेशीं ।
सजे नव्य वस्त्रें फिरे पैं उपाशी ।
विकों लागलें भाग्य ऐशा प्रकारें ।
जनां गांजिलें दैन्य दैत्यावतारें ॥ २ ॥
नको येरझारा नको बोजवारा ।
नको कोरडा देशभक्तीनगारा ।
नको तर्कसिद्धांत ते मोठमोठे ।
जुने ठेवणें तें तयानें न भेटे ॥ ३ ॥
मना सत्य सिद्धांत जीवीं धरावा ।
मनें सात्विकें, शांतिनें आचरावा ।

महाकाळ विक्राळ येऊं जरी तो
तपस्वी निजानंद ब्रह्मी डुले तो ॥ ४ ॥
सुखानें करा योग्य संसारचिंता ।
तपानें परी सांवरा देशकंथा ।
अनन्यास रक्षावयातें निदानीं ।
उडी घेतसे धांवुनी चक्रपाणी ॥ ५ ॥
जयें देशसेवाव्रता आचरावें ।
तया दीर्घकष्टींच लागे तपावें ।
तपावें तपावें पुन्हांही तपावें ।
तपीं तापतां देशनामा जपावें ॥ ६ ॥
तपाया तपोनी जगीं धन्य झाले ।
तयांचें पदीं चित्त माझें विराले ।
निराळें दिसेना गमे विश्व एक ।
जणुं गुंफिलीं सूत्रिं पुष्पें अनेक ॥ ७ ॥
चिदानंद निर्द्वंद्व खादींत आहे ।
सुखानंद स्वच्छंद तेथेंच राहे ।
निजानंदकंदा स्वयें भेटवीतें ।
चिरानंददा बंधना मोचवी तें ॥ ८ ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

घ्या खादी ! शुभ्र सात्विक खादी ! संतोषाचं स्वराज्यदान करणारी समर्थ खादी ! मंगळाचं मंगळ, महात्म्यांचं माहिमान, भक्तीचं सौभाग्य, भाग्याच्या भरतीचं भावबंधन, भिकाऱ्याची भावी भरभराट, मोहाचा मारक मंत्र, शांततेच्या सैन्याच्या शिबंदीची श्रेष्ठ निशाणी ! भ्रमाच्या भोंपळयाला फोडून भिरकावणारी भिकाऱ्याची भवानी ? अहाहा ! घ्या हो घ्या खादी ?

**सरला**—वा ! माई ! खादीची पवित्रता काय वर्णन करावी !

**पद.**

**ही शांत दिव्य खादी । भुवि ये पुन्हा अनादी ॥ ध्रु० ॥ शशि तो सुरश्मि धवलीं । विश्वास न्हावुं घाली ॥ तमिचीं भुतें पळालीं । दास्यादि वेगळालीं । ही सौख्यनाट्यनांदी ॥ १ ॥**

**गरिबांस अन्नदायी । थोरांनि ही वरावी । पुण्यांत जोड न्हावी । भूमाय हांसु द्यावी । म्हणूनि तयेस वंदी ॥ २ ॥**

ते बघा कांहीं लोक चाळींतून हांक मारताहेत तिकडे जाऊंया !(जातात.)

( रामखिलावन व विश्वासराव येतात. )

**विश्वास**—क्या तुम घर गये थें ?

**रामखि०**—हां हुजूर !

**विश्वास**—फिर तुमें घरपर कोई नहीं मिला ?

**रामखि०**—नहीं हुजूर !

**विश्वास**—बडी अफ़सोस की बात है ! रावबहादुरसाहबके तरफ गयेथे तुम ?

**रामखि०**—जी हां ! वहांपर माजीने बतलायाके उनकी लडकी और अपने बाईसाहब कहीं बाहर गये है ! मेरे पास जुरूरी लिफापा होनेके वझेसे मैं आपको धुंडता हुवा धुम रहा था ! आपके लिये मैं यहीं टहेल रहा था इस अंदाजसेके आप यहीं कहीं मिलेंगे !

**विश्वास**—( कागद वाचूं लागतात. ) ( आंतून "ध्या खादी" जुनि संस्कृति० )

**रामखि०**—हुजूर ! बाईसाब तो ये इधरसे आ रहे हैं ! ये तो खद्दड बेंच रहे हैं ! (स्वगत) ये तो अजीब मामला नजर आरहा है ! हमारे साहबके नोकरीमें खलल आनेका मौका है ! जमाना बिगड गया ! कलजगका ये परताप है !

( सरला व रेवती प्रवेश करितात. ) ["ध्या खादी"]

**सरला**—( विश्वासरावाजवळ जाऊन ) दादा !—

**विश्वास**—काय चालविलं आहे तुझी हें ? फारच शेफारल्या आहांत तुझी ! असलं वेड डोक्यांत घेऊन तुझी काय मिळवणार आहांत कुणाला ठाऊक—

**रेवती**—स्वराज्य ! ( थट्टेनं दोघीहि हंसतात. )

**विश्वास**—स्वराज्य असं अगदीं सोपंच आहे कीं नाहीं या तुमच्या सुतड्यानं तें मिळायला ! बावळट आहांत झालं ! टाका ती ठाणं दूर आणि जा आपापल्या घरीं !

**सरला**—दादा ! तुझं हें अधिकाराचं प्रेम ह्मणूं का प्रेमाचा अधिकार तूं दाखवीत आहेस असं आह्मी समजूं ?

**विश्वास**—( स्वगत ) यांनीं तर मला भारीच पेंचांत धरलं आहे ? आतां काय करावं ! आमरस्त्यावर यांना व मला कुणी पाहिलं तर ? छे निराळाच आव आणला पाहिजे त्याशिवाय सुटका नाहीं ! ( उघड ) हें पहा ! तुझी ह्मणतां त्यांतलं कांहींहि असलं तरी मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे व ह्मणूनच ज्या अर्थीं तुम्ही या स्थितींत माझ्या नजरेला पडलां आहांत त्या अर्थीं माझ्या डायरींत तुमचीं नांवं मला टिपून घेतलींच पाहिजेत ! ( डायरी काढतात. )[ घड्याळ पाहून ]—तीन तेवीस ( कांहीं लिहूं लागतात. )

**रामखि०**—येभी मजा और है ! इसे कहते है साफ नोकरी ! हमारे साहब सच्चे अफसर है ! कायदेके सामने क्या औरत और बहेन ! इन-साफ तो यूंही होना चाहिये ! सबके लिये एकसा !

**विश्वास**—( सरलेस ) नांव सांगा पाहूं तुमचं ! ( दोघीहि हंसतात. )

**सरला**—दादा ! अगदीं ओळख नसल्यासारखं काय करितां ? तुझांला नांवच लिहायचं असेल तर घ्याना लिहून ! तुझांला माहीतच आहेत नांवं आमचा ?

**विश्वास**—ऊंः हुंः माझ्या धंद्याला ओळखीची ओळख नाहीं !

सगळं कायदेशीरच झालं पाहिजे ! लवकर नांव सांगा नाहीं तर मला या चौकीवर तुम्हाला अडकवून ठेवावं लागेल !

**सरला**—( हंसून ) कुमारी सरला विचारे—

**विश्वास**—हं ! तुमचं नांव.

**रेवती**—सौ. रेवतीबाई देशमुख केअर ऑफ ( C/o ) विश्वासराव देशमुख एस्कायर डेप्युटि सुपरिंटेंडेंट पुलिस पोस्ट—

**विश्वास**—बस्स ! बस्स ! ठिकाणा वगैरे सर्व माहित आहे. जा तुम्ही आपल्या उद्योगाला !

**सरला**—सगळं कायदेशीर होऊं द्या ! सवड नसेल तर एक ठाण आज आम्ही तुमच्या घरीं देणारच आहोंत तेव्हां वाटलं तर राहिलेली माहिती द्या ! ( जातात. )

**विश्वास**—रामखिलावन ! चलो ! यह कागद जरूरी मालूम होता है ! ये गडबडमें पढना भी नही हुवा. दफ्तरमें जाकर इसको देखना चाहिये. दौडो ! वो टॅक्सी वहां खडी है उसको ठैराव. मैं आया ! ( जातात. )

( प्रवेश २ रा समाप्त. )

---

# अंक २ रा–प्र. ३ रा.

( **स्थळ**—विश्वासरावांचा बंगला. )

[ रावसाहेब भादवे ओटीवर बसले आहेत. ]

**रावसा०**—हुशः ! थकलों अगदीं बसून इथं ! (घड्याळ पाहून) एक तास झाला पण रेवती किंवा दादासाहेब यांच्यापैकीं एकाचाहि पत्ता नाहीं ! रावबहादुरदेखील इतक्यांत येतील ! मला तर खरोखर या भानगडींत इकडे आड आणि तिकडे विहीर झाली आहे ! रामरावाच्या बचावाची

खटपट करावी तर खटला माझ्याचपुढें चालायचा आहे ! दादासाहेब रामरावाचे नातलग व त्यांतून वरिष्ठ पोलीस नोकर ! विचाऱ्यांना आह्मी कांहीं मदत करूं शकत नाहीं ह्मणून सांगावं तर त्यांच्या हृदयाच्या व्यथे-वर आपण होऊन निर्दयपणानं घाव घातल्यासारखं होणार ! दुर्दैवानं कसं अगदीं पेंचांत धरलं आहे ! या चळवळीकडे पहावं तर ती शांत होण्याचं लक्षण दिसत नाहीं ! या स्वयंसेवकनोंदणीची चळवळ अती-शय जोरांत आहे. आरोपींच्या गर्दींत मि. बँकासिल्हर अगदीं अक्षरशः दाबले जात आहेत ! भला बिचारा मॅजिस्ट्रेट ! इतका खपतोय तरी वृत्ति शांतच ! सिव्हिल डिसओबिडिअन्स ह्मणे ! कसलं आलं आहे सिव्हिल ! मोस्ट अन सिव्हिल !

( रामखिलावन येतो, सलाम करतो. )

**रावसा०**—का हो जमादार ! दादासाहेब कुठं आहेत ? केव्हां येणार आहेत ते घरीं ?

**रामखि०**—जरा जुरूरी कामके लिये सदर दफ्तर गये हैं ! अभी आयें गे ! आप दीवानखानेमें बैठिये ! तशरीफ लाईयें ! मै चाका इंत-जाम करता हूं !

**रावसा०**—अच्छा ! ( आंत जाऊन बसतात. ) [ रामखिलावन जातो व रावबहादुर प्रवेश करितात. ]

**विचारे०**—काय रावसाहेब ! दादासाहेब नाहींत वाटतं घरीं ?

**रावसा०**—एवढ्या कोणत्या कामांत गुंतले आहेत कुणाला ठाऊक ? त्यांची वाट पाहून मी दमलों आहें नुसता ? त्यांचा आडली आला आहे आतांच; त्यानं सांगितलं कीं दादासाहेब लवकरच येताहेत म्हणून ! अहो, हे नुकतंच सत्याग्रहाचं खूळ माजलं आहेना! स्वयंसेवक जमवायचे म्हणे ! हे फुसके सैनिक लढाई मारणार ह्मणे ! कायद्याविरुद्ध वागणूक हीच जर राष्ट्रीय शिकवण आमच्या मुलांमुलींनीं घ्यायची तर कायद्याचं

बंधन न मानणारे हे वेडेपीर स्वराज्य कसं चालविणार ! मोठा गोंधळ झाला आहे बुवा !

**विचारे**—त्यांच्या कायदेभंगांत एक प्रकारची वेडी लहर असली तरी तिच्यांत ईश्वरी न्यायाचें ऐश्वर्य उपभोगण्याची एकजात तयारी दिसून येतें बरं रावसाहेब ! मी म्हणतों, केवळ कायदेभंग करणें आज अवेळीं मानलें तरी कायदेभंग किंवा सत्याग्रह हा मानवी मनोधारणेच्या उत्क्रांतीला पोषकच आहे. विवक्षित प्रसंगीं कायदेभंग कायदेशीर मानणें पाप होणार नाहीं पण प्रस्तुत काळ त्याला अनुकूल आहे किंवा कसें हा मात्र बिकट प्रश्न आहे.

**रावसा०**—तुमच्या मुलीनं तुम्हाला या शास्त्राचे कांहीं धडे दिलेले दिसतात ! नानासाहेब ! बंडखोरीचा बोलबाला करून शांतीच्या नांवानं नुसती बडबड केल्यानं बिलकुल यश प्राप्ती होणार नाहीं ! कुणाला नको आहे स्वराज्य ? मलादेखील पाहिजे आहे, पण काळवेळ ओळखून कार्याची दिशा आंखली पाहिजे ! मला सांगा रामरावाला जेलमध्यें गेल्यानं काय मिळवितां येईल ? मी म्हणतों प्रत्यक्ष महात्मा गांधी आज जेल-मध्यें आहेतना ? झाला का कांहीं फायदा ? उगीच भला माणूस—एरवीं गोड माणूस—बसला कीं नाहीं अज्ञातवासांत दडून ? ही कीं नाहीं मला सगळी पोरचेष्टाच वाटते !

**विचारे**—तुम्हीं तिला पोरचेष्टा म्हणा अगर कांहीं म्हणा ! भविष्य-काळाला याला काय वाटेल तें नांव देऊं द्या ! कोंवळया काळजावर कळकळीच्या उपदेशाचे शब्द कोरले जाऊन त्यांतून निघणाऱ्या प्रेमाचे हे पराक्रमी खेळ समजा का भ्रमाच्या भोंवऱ्यांत सांपडलेल्या अर्धवटांच्या ह्या भलत्याच भानगडी समजा पण त्या सर्वांतून जोंवर श्रेष्ठ सात्विक-तेचा सूर वाहतो आहे तोंपर्यंत तत्त्वदृष्टीनं तरी मला त्यांत नांव ठेवण्यास जागा दिसत नाहीं !

**रावसा०**—अरेरे ! नानासाहेब ! तुमची ही तत्वांची तारंबळ पाहून मला फार वाईट वाटतं ! आमच्या लीगमधून तुम्ही बाहेर फुटून निघणार आहांत असं मला वाटायला लागलं आहे ! आपल्या परलोकवासी पूज्य पुढाऱ्यांचा खरा राष्ट्रीय बाणा तुम्ही टाकून देणार काय ?

**विचारे**—रावसाहेब ! अशी भलतीच कल्पना आपण कां करून घेता ? अहो मी बोलतों आहें तत्वदृष्टीनं ! मला कुणी खरोखरच सत्याग्रहांत सामील व्हायला सांगितलं तर—

**रावसा०**—( टाळी देऊन ) खरंच सांगा–अगदीं खरंच सांगा–तुम्ही काय उत्तर द्याल ? द्याल उत्तर हा मी आलोंच म्हणून ? चला सांगा–लवकर सांगा नानासाहेब–तुमच्या मदतीची आम्हांला फार अपेक्षा आहे.

**विचारे**—अहा ! असे अधीर कां होतां ? मी खरोखर सांगेन कीं सत्याग्रहाला हल्लींचा काळ अनुकूल नाहीं म्हणून !—

**रावसा०**—( हातावर हात मारून ) अगदीं योग्य बोललांत ! हिंदुस्थानांत अझून शहाणीं माणसं आहेत म्हणून बरं, नाहीं तर परमेश्वरा ! देशांत कोण अनवस्था माजली असती ! विवेकबुद्धीचा वीणारव असाच मधुर असायचा ! केवळ बाह्य देखाव्यापेक्षां अशी ही गहेरी वृत्तिच बाणेदार समजली जाते ! नानासाहेब ! माझ्या हृदयावरचं मोठं दडपण तुम्ही दूर केलं आहे.

**विचारे**—आपण उगीच कांहीं तरी समजूत करून घेतलीत झालं ! मला रामरावाच्या केसबद्दल आपली सल्ला घ्यायची आहे !

**रावसा०**—ही–सल्ला–मला ( विचार करीत ) देतां यायची नाहीं ! कारण त्याचा खटला माझ्याच कोर्टांत उद्यां चालयचा आहे ! नानासाहेब ! हें एक मोठं कठीण कर्म माझ्यापुढं उभं राहिलं आहे ! समजा माझ्या हातून त्याला शिक्षा झाली–अहो होणारच–हे बावळट आपला

बचावच मुळीं करीत नाहींत. या विक्षिप्तपणामुळं शेंकडों पोरं खडी फोडायला गेलीं आहेत. माझा रामराव–

**विचारे**—रावसाहेब ! असा धीर सोडूं नका ! मी काय म्हणावं ! माझी पोर अगदीं "तुरुंगाच्या दारांत" बसल्यासारखी आहे ! ऐन लग्नाच्या वेळीं रामरावाला पकडून नेलं ! या असल्या आघातांनीं माझं हृदय चूर्ण झालें आहे पण करायचं काय ? धीर धरलाच पाहिजे ! तुम्हीं कांहीं विचार केला नाहीं रामरावाबद्दल ?

**रावसा०**—मी कसला विचार करूं ? मी स्वतंत्र आहें तसा विचार करायला ! ही म्याजिस्ट्रेटी येतेना आडवी !

**विचारे**—मग द्याना एकदम राजीनामा ? म्हणजे निदान तुमच्या हातानं तरी रामरावाला–

**रावसा०**—अहो पण तसं केलं तर मी गांधीभक्त, असहयोगी, सत्याग्रही, कायदेभंग करणारा म्हणवला जाईन ना ? माझ्या अंगीकृत तत्वांशीं बेइमान होईन ना ? वचनभंगाचं मला पातक लागेल ना ? अशांततेचा व बंडखोरीचा मी भागीदार होईन ना ! त्यापेक्षां—

( विश्वासराव येतात. )

**विश्वास**—नमस्कार ! मला आज जरा वेळ झाला यायला ! अनंत कामं आहेत. हें स्वयंसेवकनोंदणीचं गाडं पुन्हा सुरूं झालं आहे ! हें कोणत्या थराला जाईल याचा नेम नाहीं ! सारखी धरपकड सुरू आहे ! रामखिलावन !

**रामखि०**—हुजूर !

**विश्वास**—चाह तैयार है ! लाव जल्दी ! ( चहा घेतात. )

**रावसा०**—रेवती दिसत नाहीं अजून ! नानासाहेबांच्या इथंच आहे का मुक्काम ?

**रावबहादुर**—( विश्वासराव स्तब्ध राहतात. ) कां विश्वासराव स्तब्धसे ? असे उसासे कां टाकतां ? झालं आहे तरी काय ? रेवती कुठं आहे ? सरू बरोबर गेली ना ?

**विश्वास**—होय. पण—

**रावसा०**—पण काय ? नानासाहेबांच्या घरीं गेलीना ? का तिचाही मेंदू या वावटळीनं बिघडला ? सांगा काय झालं तें ?

**विश्वास**—त्या दोघींनीहिं स्वयंसेवक म्हणून आपलीं नांवं नोंदविलीं व नंतर या माझ्याच हातांनीं—

**विचारे**—हाय हाय ! अखेरीस गोष्ट या थराला आलीना ? हा भीषण प्रयोग असा आमच्या काळजाचा तुकडा तोडून पूर्ण झाला म्हणतां ? सरूं–रेवू ! काय केलंत हें ! कोंवळ्या पोरींनों ! तुमच्या तत्वनिष्ठेची तारीफ करूं का या काळाच्या खेळांतलीं उनाड बाहुलीं म्हणून तुम्हांला दोष देऊं ! रावसाहेब ! माझं मस्तक भ्रमण करायला लागलं ! मला अंधार दिसतो आहे ! सरू ! आमच्या म्हातारपणीं—( बेशुद्ध. )

**रावसा०**—( विचाऱ्यांना सांवरीत ) [ दुःखानें ] चळवळ्यांनो ! पाहिलंत ? अशीं कित्येक दुःखी मातापितरं तुमच्या या माकडचेष्टांना बळी पडलीं असतील याची तुम्हांला कल्पना तरी आहे काय ! मि. बॅंक सिल्व्हरला सांगतों कीं सुळीं द्या या सर्वांना !

पडदा पडतो.

प्रवेश ३ रा समाप्त.

# अंक २ रा—प्रवेश ४ था.

रस्ता—( विश्वासराव प्रवेश करितात. )

**विश्वास**—माझ्या आयुष्यांतल्यासारखे अद्भुत अनुभव फारच थोड्यांच्या वांट्यास आले असतील ! कर्तव्यनिष्ठेच्या करकचणाऱ्या काचणीनं माझं हृदय आणखी कोठवर जखडलं जाणार याचा मला कांहींच उमज होत नाहीं ! आतां केवळ माझ्याच हातानं माझा मीच कैद व्हायचा राहिलों आहें ! या धामधुमींत इतके अधिकारी काम करीत असतांना केवळ यदृच्छेनं माझींच माणसं माझ्या हातानं प्रतिबंधांत पडावीं याचा खास माझ्या भावी आयुष्यक्रमावर कांहीं परिणाम घडावा अशी परमेश्वरा तुझीच तर इच्छा नाहींना ? वैराग्याच्या वैभवानं विभूषित झालेल्या या विजयेच्छू विभूतींना केवळ वीतभर पोटासाठीं विकलेल्या या हातानं बंधन करणं मला कां प्राप्त झालं ? जगदीश्वरा ! माझ्या मानी हृदयांत इमानावांचून इतर वस्तू तुला खरोखरच दिसते काय ? इमानानं नोकरी करणं तुझ्या दृष्टीनं गुन्हा होतो काय ? काय असेल तें तुझं तुलाच ठाऊक !

पद.

काय तें कळेना । हेतु हृदयीं तुझ्या राहि ।
जगपाल नंदलाल ! वद तरि भ्रमित मम मना ॥ धृ० ॥
विद्या म्हणुंच का ही । अविद्याच वा मोहि ।
नवलींच चकली । मति त्रैगुणा ॥ १ ॥

माझं आजचं कार्य म्हणजे एक अनाहूत आपत्तीच मजवर आली आहे. पब्लीक प्रॉसिक्यूटर एकाएकीं आजारी झाल्यामुळें वरिष्ठांच्या हुकमी डोळ्यापुढें दैवानं मीच उभा राहिलों ! रामरावाचा खटला मला चालवावा लागणार ! निर्दोष, निष्पाप, रामरावावर मी आरोपांचे

आज ढीग रचणार ! कायद्याच्या कलमांच्या कसाचे वळसे माझ्या रामरावाच्या निर्मल हृदयावर घांसून मी आज मानवी न्यायाचं तोंड उजळ करणार ! दैवाची अशी ही आडदांड दांडगाई माझ्या बाबतींत किती दिवस चालणार कुणास माहित ? असो. आलेलें काम कसं तरी पार पाडलंच पाहिजे ! ( जातात. )

[ सरला व रेवती येतात ]

**सरला**—माई ! आज कोर्टांत भारी गर्दी झाली असेल ! आज आपणांला अमळ जास्त वेळ झाला ! आईच्या स्थितीकडे पाहून मला कसंसंच झालं !

**रेवती**—तरी बरं झालं. काल आपणांला पकडल्याचं नानासाहेबांनीं काकूंच्या कानावर घातलं नाहीं तें ! नाहीं तर त्यांनीं आकांतच केला असता ! आपणांला उद्यां कोर्टांत हाजर राहण्याच्या केवळ आश्वासनावर सोडून दिलं हेंहि एकापरी बरंच झालं !

**सरला**—माई ! नाहीं, तें कांहीं बरं झालं नाहीं ! आईची जरी मी निराशा केली तरी माझे बाबा तिला धीर देतील ! त्यांच्या दृष्टीनं मी जरी अंधभक्तीच्या आंधळ्या अंधेरांत उडी घ्यायला तयार झालें आहें तरी माझ्या मनाची उडी अधोगामी नाहीं ही त्यांच्या मनाची खात्री आहे. माई ! मला वाईट वाटतं ते एकाच गोष्टीचं-माई सांगूच कां तुला माझ्या मनांतली गोष्ट ?

**रेवती**—( तिला कुरवाळून ) सांग, सांग बरं सरूताई ! तुझ्या मनांतली गोष्ट म्हणजे ध्येयभक्तीच्या भाग्याची उत्कटताच असायची !

**सरला**—माई ! मला वेड्यांत नाहीं ना काढणार तूं ?

**रेवती**—खुळी नाहीं तर ! विघ्नांच्या वाफाऱ्यांत विवेकाशीं गोष्टी करीत विश्वाची चिंता वाहणाऱ्या तुझ्या विश्वकल्याणी हृदयांत वेडाचा मागमूस मला तरी दिसणार नाहीं.

**सरला**—आला पुन्हा वेताळ पूर्वस्थळावर ! माई ! मलाहि कुणी गुरू आहेत हो ! पण तें जाऊं दे. सांगतेंच तुला मी माझ्या मनांतलं. माझी आपली इच्छा त्यांच्या खऱ्या परिक्षेला उतरायचं ही आहे ! आजच–अगदीं आजच–त्यांना पुण्याश्रमाचा लाभ मिळेल. त्या दिवशीं लावलेली हळद आणि मळवट अजून त्यांच्या चेहऱ्यावर विराजमान असेल. मळवटाची रक्तप्रभा हळदीच्या पिवळींत मिसळल्या-मुळें बालसूर्याप्रमाणं शोभणारं त्यांचं मुखमंडल आज त्या पाषाणदुर्गाला ही उजळा देईल. अशा वेळीं माई ! मी बाहेर असेन ! त्या वेळीं त्या दुर्गद्वारांत त्यांना पंचारती करायला कुणी नको का ?

## पद.

**संधि विधि हरी । सुकृत फलाची । श्रेष्ठ सुखाची ॥ संधी ॥ध्रु०॥**
**उर्मी जिवाची । चढुं लागतांची । निवळे मंगलतेची ॥ १ ॥**

माई हा एवढा अट्टाहास केवळ त्याकरितां केला बरं ! दैवानं कालची पर्वणी गमावली ! माई !—

**रेवती**—कर्दन काळाच्या राजवटीला पुण्याईची पर्वणी मानणाऱ्या या सात्विक सांप्रदायांतील ही चिरंजीव चढाओढ पाहून सरूताई, भगवंतालाहि एकदां या मृत्युलोकचं दर्शन घ्यावंस वाटेल !“ एका देवाच्या सख्यत्वासाठीं, पडाव्या जिवलगांच्या तुटी, सर्व अर्पावें शेवटीं, प्राण तोही वेंचावा ” ही आपली उक्ती सार्थ झालेली पहाण्यास श्रीसमर्थांचा दिव्य आत्मा आजच्या प्रत्येक सत्याग्रह्याभोंवतीं अनंत आशिर्वाद देत फिरत असेल ! ताई ! कालची पर्वणी टळल्यासारखं वाटलं तरी तुझ्या-करितां भगवंतानं एक निराळाच योग निर्माण केला आहे असं मला वाटतं.

**सरला**—माई ! सांग ! लवकर सांग ! तो पुण्ययोग मला एकवार ऐकूं दे !

**रेवती**—तूं रामरावांना आपला गुरू समजतेस ना ? तुझे रामराव पुण्याश्रमांत जातांना त्यांना पंचारती करायला भगवंतानं निराळीच योजना केली आहे ! दुर्गद्वारावर अष्टदिशा आपल्या कोमल निश्वसनांनीं त्यांचं अवघ्राण करतील. दुर्गाचे दगडी कोट मानवानांहि लाजविणाऱ्या चपलाईनं आपल्या लोखंडी अंतःकरणाचे पट मोकळे करून त्यांना आंत घेतील. सहस्त्ररश्मी कोठडीच्या बारक्या खिडकींतून आपला हात घालून कुरवाळतांना स्वतःला धन्य समजेल. तुझ्याकरितां देवानं योजलेली कामगिरी तुझ्या भक्तीला साजेशीच आहे. जो पुण्ययोग तुझ्या लग्नाच्या बोहल्यावरून दैवानं ओढून नेला तो पुण्ययोग तुला आज कोर्टाच्या आवारांत लाभेल

## पद.


**माझे गुणवती । देवी भगवती होई वरद ती**
**तुझ्या तपे ती प्रचीती दे हैमवती ॥ घृ० ॥**
**विहंग मंगल गाती । वृक्षीं बसोनी ।**
**वायु धरी तो, । अंतःपट तो संप्रती ॥ १ ॥**

आज रामरावांशीं तुझं खरं लग्न होईल ! आज तुमचं शुभमंगल होईल व उद्यांपासून तुम्ही दोघे पुरुषार्थसाधनाच्या पहिल्या प्रयोगाला सुरवात कराल.

**सरला**—अहाहा माई ! चला कोर्टांत खटला केव्हांच सुरू झाला असेल ! चला ! माई ! तुझ्या आशिर्वादानं तसं पुण्य मला लाभूं दे ! ( जातात. )

( पडदा. कोर्टाचा देखावा. )

**विश्वास**—आतांपर्यंत झालेल्या फिर्यादीतर्फेच्या साक्षींवरून कोर्टाची खात्री झालीच असेल कीं आरोपीनं १२४ अ कलमाप्रमाणं गुन्हा केला आहे ! साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचं आरोपीनं



सरला०—पुण्यजीवा। सात्विक संपदा। [ अंक २ प्र० ४ पृष्ठ ५२.

नाकारलं असल्यामुळं आरोपीचं म्हणणं ऐकून घेऊन खटल्याचा निकाल करण्याबद्दल कोर्टाला माझी नम्र विनंती आहे.

**विचारे**—कोर्टाला माझी एक विनंती आहे. आरोपीतर्फे वकील म्हणून उभा राहण्याची कोर्टानं मला परवानगी द्यावी.

**विश्वास**—वकीलपत्रावर आरोपीची सही पाहिजे ती नसल्यामुळें रावबहादुरांना काम चालविण्यास कोर्टानं परवानगी देऊं नये अशी मी विनंती करतों !

**विचारे**—आरोपीच्या वडिलांनीं केलेल्या मृत्युपत्राप्रमाणं मी आरोपीच्या इस्टेटीचा हेड ट्रस्टी या नात्यानं व त्यांत असलेल्या विशेष उल्लेखाप्रमाणं आरोपीचा मी पालक ठरतों व त्यामुळं वकीलपत्रावर सही करण्याचा किंवा स्वतःच काम चालविण्याचा मला हक्क आहे. शिवाय या कोर्टांत वकीली करण्याचा माझा हक्क कोर्टाला ठाऊक आहे !

**रामराव**—नानासाहेब ! माझ्या वडिलांचे परमस्नेही या नात्यानं मी आपणांला वंदन करतों ! तथापि या खटल्यांत आपण परिश्रम घेऊं नये अशी माझी आपणांला नम्र विनंती आहे ! कायद्याच्या कलमांना कवाईत शिकविली जातांना किमियेच्याहि पलीकडे त्याला कसं कसं अद्भुत स्वरूप येतं याचा आपणांला अनुभव आहेच ! माझा गुन्हा स्पष्ट असून कायद्यांतले शब्दहि स्पष्ट आहेत ! न्यायाधीशमहाराज ! नानासाहेब ! मला क्षमा करा ! वकीलपत्र मला संमत नाहीं !

**रावसा०**—आरोपीची इच्छा नसली तरी आरोपीच्या तरुण वयाकडे पाहून व त्याच्या बहकलेल्या मनःस्थितीकडे पाहून मी रावबहादुरांना आरोपीतर्फे काम चालविण्याविषयीं परवानगी देतों !

**रामराव**—पण माझा स्वच्छ कबूलीजबाब असतांना वकीलाची जरूरच लागत नाहीं, ही गोष्ट मी कोर्टाच्या नजरेस आणतों ! दैवी कायद्याहून मानवी कायदे निराळे असतात व प्रस्तुत कायद्याप्रमाणें ज्याच्या विरुद्ध काम चालतें त्याला शिक्षेवांचून सोडून देणें त्या कायद्याच्या तपशिलाच्या विरुद्ध वागण्यासारखें होईल !

**राव.विचारे**—रामराव ! माझं ऐका ! निदान जामीन देण्याबद्दल तरी मला कोर्टाला विनंती करूं द्या ! तुमच्या ध्येयाच्या आड येण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं पण तुमच्या परमपूज्य पित्यानं माझ्यावर जी जबाबदारी टाकली आहे तिला तर मला पार पाडूं द्या ! तुमच्या पित्याचा एक जिवलग स्नेही या नात्यानं तुमच्या वडिलासारखंच तुम्ही मला मानायला हवं.

**रामराव**—नानासाहेब ! माझ्या पूज्य पित्याच्या चरणांना स्मरून सांगतों कीं आपण माझ्या ध्येयाच्या आड येऊं नये. माझ्या धवल ध्येयाची धांवती गंगा आपण अशी अडवून धरूं नका.

**रावसा०**—( स्वगत. ) ही जामिनाची क्लृप्ती बरी आहे (विश्वास-रावास ) आपणांला वेळीं कलम बदलण्याची परवानगी आहे काय ? १०८ कलम लावलं तर ?

**विश्वास**—आरोपीच्या वडिलांचा हुद्दा आणि मानमतराब ध्यानांत घेऊन त्याचं तरुण वय विचारांत घेऊन व त्याच्या बहकलेल्या डोक्याची परिस्थिती लक्षांत घेऊन १०८ कलमाप्रमाणें आरोपी कबूल असल्यास कारवाइ करण्याचा मला सरकारकडून हुकूम आहे. यांनीं जेलांत जावं अशी सरकारची मुळींच इच्छा नाहीं. मात्र यांनीं आरंभिलेले वेडेचार बंद व्हावे एवढीच त्यांची इच्छा आहे.

**विचारे**—मग कोर्टानं १०८ प्रमाणं काम चालवावं अशी माझी विनंती आहे !

**कोर्ट**—आरोपी यावर तुमचं काय ह्मणणं आहे ! आहांत कबूल जामीन द्यायला ! दहा हजारांचा एक वर्षाकरितां चांगल्या वर्तणुकीचा जामीन हवा !

**विचारे**—मी घेतों हमी ! दहा हजारांपासून एक लाखपर्यंत नग्द रुपये भरायला मी तयार आहें !

**रामराव**—तुमच्या या प्रेमाबद्दल अंशतः तरी उतराई होण्याची वेळ

प्रमून मला आणून द्यावी अशी माझी त्याच्या चरणीं विनंती आहे! न्यायाधीशमहाराज! न्यायदेवतेच्या ठिकाणीं माझा अत्यंत आदर आहे, आणि न्यायाकरितां तर आमचा नवा सांप्रदाय आहे! माझा पहिला आणि शेवटचा जबाब आपण कृपा करून ऐकावा! आपण मागत असलेला जामीन देणं माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत अशक्य आहे! स्वतंत्र जीवाला जामीन कसा पटेल? जळजळीत ध्येयाच्या जोमदार जाळाशीं जामीनाच्या जीर्ण जिण्याचा संयोग कसा होईल! वर्तणूक चांगली का वाईट हें चटदिशीं ठरवायला मानवी चंचल कायद्याला ईश्वराच्या चिरंतन कायद्याची मदत घ्यावी लागेल! महाराज! माझं अंतःकरण शुद्ध आहे! कुणाशीं केवळ विरोध करावा या दृष्टीनं मी कांहींहि केलेलं नाहीं! मी ईश्वराला स्मरून सांगतों, माझ्या सदसद्विवेकबुद्धीला जें वाटलं त मी बोललों त्यांत सांप्रतच्या राज्यपद्धतीचा संबंध येणं अपरिहार्य होतं! आमच्या हेतूंचा विपर्यास होत असलेला पाहून वाईट वाटतं! आमच्या अंतःकरणांत द्वेषाला, हिंसेला, सूडाला आणि त्यासारख्याच पाशवी विचारांना स्थान नाहीं! आम्हाला आत्मबलाच्या जोरावर सत्याचं साम्राज्य प्रस्थापित करावयाचं आहे व त्याकरितां वेळ पडल्यास आम्ही आपलं सर्वस्वाचं बलिदान करायला तयार आहोंत! आमची वागणूक आपल्या दृष्टीनं जर वांकडी दिसत असेल तर त्याबद्दल आपण आम्हाला इच्छेला येईल ती शिक्षा करावी! त्याविरुद्ध एक चकार शब्दसुद्धां आम्ही काढणार नाहीं! उलट ती मोठ्या आनंदानं भोगण्यास तयार आहों! महाराज विलंब लावूं नका व कायद्यांतली कमाल शिक्षा देऊन टाका!

**रावसा०**–(स्वगत) हरहर! परमेश्वरा! महाकठीण प्रसंग तूं मजवर आणला आहेस! सरसाहेब! या वेळीं मला आपली न्यायनिष्ठुरता द्या! पण आतां जास्त विचार करायला वेळ कुठं आहे? (उघड) [ विश्वासरावास ] ज्या अर्थीं आरोपी जामीन द्यावयासहि तयार नाहीं व

आपला बचावहि करीत नाहीं त्या अर्थी जजमेंट याच घटकेला देऊन टाकून मी मोकळा होणार आहें ! ( लिहूं लागतात. )

**रामराव**—(रेवतीस) वहिनी ! दादासाहेबांना माझे साष्टांग प्रणिपात सांगा. सरलेला सांगून मजकरितां नानासाहेबांची क्षमा मागा. तुम्हीहि आपल्या परी या पुण्यकार्याला हातभार लावा. मी परत आल्यानंतर कैवल्यप्राप्तीच्या मधुर आनंदांत डुलत असलेल्या मला दिसा. सरलेला सांगा रामरावाला विसर म्हणून !

**रेवती**—भावोजी ! असं काय बोलतां हें ? तुम्हाला ऐकून आनंद वाटेल कीं आम्ही दोघींनींहि तुमचाच कित्ता गिरविण्याचा निश्चय केला आहे !

**रामराव**—अहाहा! असं असल्यावर, माझ्या देशभगिनींनीं असा निश्चय केल्यावर भारतमातेचं दैन्य दशदिशा पळून जाईल ! चहूंकडे दिव्यात्मे चमकूं लागतील ! दैवाचे दुर्दिन संपून देवांचं साम्राज्य या देवभूमीवर नांदायला लागेल ! देशांतल्या देवतांनो, माझा तुम्हाला नमस्कार असो.

**कोर्ट**—( जजमेंट वाचीत ) आरोपी रामराव गोविंदराव देशपांडे, ज्या अर्थी फिर्यादींत दाखल केल्याप्रमाणें गुन्हा तुझ्यावर शाबित झाला आहे व ज्या अर्थी हट्टानं आणि दुराग्रहानं तूं आपला बचावसुद्धां केला नाहींस त्या अर्थी तुला कमाल शिक्षाच द्यायला हवी होती पण केवळ तुझ्या वयाकडे पाहून व तूं चांगला घरंदाज सच्छील गृहस्थ आहेस या गोष्टीकडे नजर देऊन हें कोर्ट तुला तुझ्या भयंकर गुन्ह्याबद्दल केवळ दोन वर्षांची साध्या कैदेची शिक्षा देत आहे ! तुला शिक्षा देतांना तुझी मला कींव येते पण कायद्यापुढं माझा नाइलाज आहे ! ह्या मुदतींत केव्हांहि तुला पश्चात्ताप झाल्यास व तो तूं प्रदर्शित केल्यास तुझ्या त्यामुळं होणाऱ्या सुटकेनं मला अत्यानंद होईल ! पोलीस घेऊन जा याला ! ( पडदा. )

[ वंदे मातरम् पद्यांत ] ( विश्वासराव, विचारे, सरला, रेवती व रामराव पुढें येतात. )

[ गज्जल. ]

**स्वयंसेवकः—**

हमारा सत्य पे निश्चय हमारा राम साथी है।
हमारी शांतीकी दौलत। निशानी एक खादी है॥ १॥
जमाना प्रेमसे जीतूं। अदय भी कोइ क्यौं ना हो।
निभावूं ऐक्यकी बाजी। अगर सर क्यौं न कटता हो॥ २॥
अनत्याचार कीं सैली भली ईमानकी झोली।
अलख जागे जमानेमे फकीरी खूब मतवाली॥ ३॥

**रेवती**—भावोजी ! या मंगल प्रसंगीं माझ्या सरूताईची एक इच्छा आपण पूर्ण कराल काय ?

**रामराव**—तिच्या इच्छेची पूर्तता करणारा रामराव आतां खरोखर जिवंत आहे काय वहिनी ?

**सरला**—( पुढें होऊन ) माझी कांहीं पार्थिव इच्छा आहे असं वाटतं का आपणांला ? हृदयेश्वर ! महाराज ! पुण्यश्लोक देशभक्त या नात्यानं भारतमातेची एक कन्या आपल्या या सत्वपरिक्षेच्या वेळीं आपलं पूजन करूं इच्छित आहे ! आपण शिकविलेल्या मार्गावरून जाण्याचा अधिकार प्राप्त व्हावा या हेतूनं, दैवी न्याय या भूमीवर वावरावा म्हणून दुःखाच्या दावानलांत सुखानं उडी घेणाऱ्या आपल्या पुण्यवान पायांची पूजा करावीशी मला वाटते !

**पद.**

पुण्य जीवा, सात्विक संपदा।
पुजी तुझी नमुनिच या पदा॥ ध्रु० ॥
वाहियलें कधींच तनूस मी।
देव माझा, तुझी देवि मीच मी।
दुजाभाव चित्तीं न येई कदा॥ १॥

( हार गळ्यांत घालते. रेवती शुभमंगल सावधान म्हणते; रामराव, विश्वासराव शिपायाबरोबर निघून जातात. ) ( पडदा पडतो. )

अंक २ समाप्त.

# अंक ३ रा.—प्रवेश १ ला.

[ स्थळः—तुरुंग—पात्रें—रामराव विचार करतो ]

### पद.

रामराव—

संता करी व्यसनकालीं । प्रभु प्रगट अवनींतलीं ॥ ध्रु० ॥
विचरीतां संकटतमीं । जन होती गुंग निकामी ।
प्रणतपाल ये वनमाली ॥ ध्रु० ॥
सत्य शुभद अभय वरद सत्व नभीं उदित शशी
नव सुशांति देत सुकालीं ॥ १ ॥

भारतवर्षाच्या इतिहासांत अठरा हा आंकडा कसकसा परिवर्तन करीत गेला, हा विचार करतांना महात्मा गांधींना १८ तारखेलाच कां शिक्षा झाली, याचा उलगडा माझ्या भोळ्या मनाला व्हायला लागतो! अगदीं प्राचीन पुसट इतिहासापासून जरी पाहिलं, तरी १८ च्या आंकड्याला नवग्रहाच्या युतीचा दुप्पट जोर मिळाल्याचा भास होतो! अठरा दिवसांत १८ अक्षौहिणी दळांना गारद करणारें महाभारत शब्दांच्या साखळींत गोंवतांना श्री. व्यासांनीं त्या रोमहर्षण इतिहासाची अठराच पर्वें रचून त्याला समाप्त केला. मोहाची मवाळ मनोवृत्ती अर्जुनाच्या मानगुटीवर बसली असतां विश्वमोहन श्रीकृष्णानं आपली कर्मयोगाची शिकवण १८ अध्यायांतच दिली! श्रीव्यासांनीं प्राचीन इतिहासाचं टांचण करतांनाहि पुराणांना १८ च्या पलीकडे जाऊं दिलं नाहीं! मधल्या काळांतहि १८चे प्रताप बरेच झाले असतील! अगदीं अलीकडे अठराव्या शतकांत प्लासीपानपतासारखे स्वातंत्र्य निर्मूलनाचे दुर्धर प्रसंग ओढवले! १८व्यां शतकानं आपल्या अंतकाला बरोबर महाराष्ट्र मुत्सद्दी नाना फडनवीस यांना-

हि कालाच्या दाढेंत ढकलून दिलं ! १८१८ हा महाराष्ट्रस्वातंत्र्याचा समाधीकाल ह्मणून प्रसिद्धच आहे ! १९१८ त सगळ्या जगाला चटका लागणारं महायुद्ध समाप्त होऊन हिंदुस्थानांत स्वातंत्र्येच्छा बळावूं लागली ! अठरा विश्वे दारिद्र्याबरोबर झगडत असतांना अखंड दास्याची मायिक मनोवृत्ती दडपून टाकण्याकरतां महात्माजींचा मननीय संप्रदाय सरू झाला ! असलं चमत्कारिक कालपरिवर्तन या एकाच आंकड्याच्या नशिबाला दिसतं आहे. ( डॉ. गुडहार्ट प्रवेश करतात. )

**डॉक्टर**—मिस्टर देशपांडे, असे रात्रंदिवस बसून कसला विचार करीत असतां तुह्मी ? अशानं तुमच्या प्रकृतीला अपाय नाहीं का होणार ? कालपासून तुह्माला खोकला येतो आहे ! आराम कराना थोडा ?

**रामराव**—डॉक्टरसाहेब ! आपल्या सौजन्याबद्दल मी आपला फार आभारी आह ! माझ्या देशावर आभाळ फाटलं असतांना आराम घेण्याचं माझ्या मनांतच येत नाहीं ! आशेची आत्यंतिक सीमारेषा ओलांडून गेल्यानंतर निराशेचं निबिड अरण्य आह्मांला लागल्यामुळं निराशेच्या नादानपणांतूनच नवलाईचं निवासस्थान निर्माण करण्याचा आमचा उद्योग चालू आहे ! आरामाला आह्मी केव्हांच रामराम ठोकलं असून आत्मबलाच्या आंचेनं निराशेचं जंगल जाळून टाकण्याचं आह्मी ठरवलं आहे !

**डॉक्टर**—( हंसून ) मिस्टर देशपांडे, आजच्या जडवादी जगांत असल्या उच्च उद्योगाची मात्रा पचविण्याचं सामर्थ्य आहे अशी आपली समजूत आहे काय ? भारताच्या उन्नतीकडं उत्साहानं पाहणारा एक यूरोपियन या नात्यानं मी आपणांला हा मोकळा प्रश्न करतों. जडवादाचा हलकल्लोळ माजलेल्या या गरजू जगाच्या वावटळींत चैतन्याचा हा तेजस्वी दिवा टिकाव धरील का ? आपणांला राग येणार नाहीं तर विचारतों, चौरीचौऱ्याचा अत्याचार कां झाला ? मुंबईचा दंगा—

**रामराव**—डॉक्टरसाहेब ! मुंबई आणि चौरीचौरा येथील बेफामपणा निर्लज्ज, आणि राक्षसी मनोवृत्तींनीं लडबडलेला आहे. आम्ही त्याचा तीव्र निषेधच केला आहे. आमच्या आकांक्षांचा त्यानं निर्दयपणानं खून केला आहे ! अत्याचाराचा आसुरी मार्ग आक्रमण करणारा अनाचारी मनुष्य अवश्य दंडनीय आहे ! आमच्या सूत्रांत त्याचा समावेश नाहीं. पण डॉक्टरसाहेब ! आत्मबलाची अद्भुत वैजयंती गळ्यांत घालून मिरविणारे सहस्रावधी लोक आज जे तुरुंगांत आहेत, त्यांच्याकड पाहून तरी आपणांला काय वाटतं ?

**डॉक्टर**—त्याच्याबद्दल मला आदरच वाटतो, पण ही गोळी पचायला जडच आहे, किंबहुना अशक्यच आहे, असं माझं प्रांजल मत आहे ! यामुळंच आम्हां युरोपीयनांना या चळवळीनं धोका पोंचेल अशी शंका यायला लागली आहे !

**रामराव**—डॉक्टरसाहेब ! युरोपीयन लोकांविषयीं व्यक्तिशः आमचा बंधुभावच आहे. ते आमचे बंधू याच नात्यानं आम्ही त्यांच्याशीं वागत आहोंत. आमचा सारा प्रयत्न हा भेदभाव काढून टाकून सर्वत्र प्रेमाचं साम्राज्य व्हावं अशा करतांच आहे. सर्व जातींचं प्रेमळ ऐक्य देशांत नांदावं या दृष्टीनंच आम्ही आमच्या प्रयत्नांची दिशा रेखाटली आहे ! डॉक्टरसाहेब, आमच्या या चळवळीकडं आपण निर्विकल्प दृष्टीनं पहा व निर्भय रहा ! आमचे महात्माजी कोणत्या योग्यतेचे आहेत, आपणांला माहीत आहेच ?

**डॉक्टर**—निर्मळपणानं सांगावयाचं म्हणजे, ते एक बिनमोल रत्न ईश्वरानं या मृत्युलोकाला बहाल केलं आहे, असंच माझं मत आहे. आमच्या ख्रिस्ताचाच हा अवतार आहे कीं काय असं आमच्यापैकीं बऱ्याच विचारी लोकांचं म्हणणं आहे—पण—

**रामराव**—डॉक्टरसाहेब ! अडखळूं नका ! स्पष्ट बोला ! त्यांचीं

मतं व्यवहारांत नडतात असंच ना तुमचं म्हणणं ? अहो ! त्यांच्या तत्त्वांना योग्य रितीनं समजून घेण्याची आपली इच्छा असल्यास फुरसतीनं मी आपल्याला ती विशद् करून सांगेन. त्यांत नवचैतन्याची धडाडी असली तरी निजलेल्याला जागं करण्याकरितां त्याला गदगदा हालवावं लागतं त्याप्रमाणं हा प्रयत्न आहे ! कैवल्यप्राप्ती म्हणजे किंडनगार्टन्‌चा खेळ आहे, अशी ज्यांची समजूत आहे, त्यांना हें पटणार नाहीं. पण समाजाची सारासारविचारशक्ति ज्या आत्मशक्तीच्या बलानं विजेच्या प्रवाहाप्रमाणं झणझणून जागृत होते, ती शक्ती मोहाची काळरात्र ओसरतांच विवेकाच्या दिव्य उषेशीं खेळूं लागते ! व्यवहाराला मागं वळवून विश्वाच्या अंतःकरणांतलि जीवज्योत बालसूर्याच्या नव्या किरणांनीं ती प्रज्वलित करते ! डॉक्टरसाहेब ! बेफाम व्यवहाराला बिनडाग इमानदारीचं बिनमोल अमृत पाजून जगाचा सात्विक व्यवहार चालविण्याचं बिकट कार्य आजपर्यंत अशाच शक्तीनं केलं आहे ! ख्रिस्त सॉक्रेटीस वगैरेंच्या छळांतून नवशक्तीची पुण्यगंगा वाहिलेली आहे ! काम कठीण पण तें करणंच भाग आहे !

**डॉक्टर**—मला तुमच्या तत्वांचा योग्य बोध झाला. मिस्टर देशपांडे, तुमच्या तत्वनिष्ठेबद्दल मला फार आदर वाटतो. बोलूं आपण आणखीं एखादे वेळीं. सध्यां तुम्हांला माझ्या देखरेखींखालीं हॉस्पिटल्‌मध्येंच ठेवणं जरूर आहे. तुमची प्रकृती मला ठीक दिसत नाहीं. बघूं ! [ स्टेथॉस्कोप लावून पहातात, नाडी पाहून. ] मिस्टर देशपांडे, तुम्हांला थोडा ताप आहे, ब्रॉंकाइटीस आहे, मी तुम्हाला उत्तम औषध देतों. एक दोन दिवसांत तुम्ही बरे व्हाल. मी डॉक्टर जाफरना इकड पाठवितों त्यांच्याबरोबर तुम्ही हॉस्पिटल्‌मध्यें या, तुमचा चरका व पुस्तकं तिकडच घेऊन या वाटलं तर. लॉयब्ररींतच निराळी सोय करतों तुमची.

**रामराव**—नाहीं, मल कांहीं तितकी काळजीची प्रकृती नाहीं वाटत

माझी. सध्यां मी आपल्या सांभाळीं आहें, तेव्हां आपण सांगाल तसें वागण्यावांचून मला गत्यंतर नाहीं.

डॉक्टर—बरं ! गुड डे. ( पडदा. डॉक्टर पुढें येऊन. ) महात्म्यांचं महात्म्य मननिय खरं ! असहकारितेच्या खऱ्या तत्त्वांचा मला आज खरा उलगडा झाला. मातृभूमीसाठीं देवाच्या साम्राज्याचा साऱ्या जगावर उदय व्हावा म्हणून आपल्या सर्वस्वाचं बलिदान करणाऱ्या या राष्ट्रविभूति पाहिल्या म्हणजे भारताचं दैन्य संपलं असंच म्हणावं लागतं ! माझ्या या कैदखान्यांत असलेले हे पुण्यात्मे निर्मल, आनंदी आचरणानं इथल्या नरकवासाला नवा स्वर्ग बनवीत असल्याचं माझ्या नजरेला येत आहे ! महात्मा गांधी ! अहाहा ! या योगानं का होईना या पुण्य पुरुषाचा सहवास कांहीं काल लाभण्याचा पुण्ययोग ईश्वरानं माझ्या दैवांत लिहिला ही त्याची अनंत कृपा आहे ! निढावलेले, खुनी, दरोडेखोर कैदी कामावर जातांना महात्माजींच्या कोठडीपुढून जाण्याचा आग्रह धरितात, त्यांना वंदन करतात, यावरून हा एक अलौकिक सत्पुरुष आहे अशी माझी भावना झालीच होती. त्यांच्या या शिष्यानं तर मला अधिक अधीर केलं आहे ! सेवासंन्यास करून यांच्या सांप्रदायांत सामिल व्हावं असंही मला वाटायला लागलं आहे ! पुढं काय होणार आहे, ईश्वर जाणे ! मला या लोकांच्या संगतींत बसून रहावंसं कां वाटतं ! पण छे ! इतकं दुबळं होणंहि चांगलं नाहीं ! जें होईल तें दिसेलच ! आपण परदेशी लोक ! ( पडद्यांत-वंदे-मातरम् ) [ पाहून ] ओहो ! ही एक-सत्याग्रही सेनेची तुकडी दारांत शिरली ! पुण्य श्लोकांनों ! तुम्हांला माझं वंदन असो ! ज्या देशांतले स्त्रीपुरुष असली ध्येयनिष्ठा दाखवूं शकतात त्याला दास्यांत फार दिवस खितपत पडावं लागणार नाहीं हें खास ! ( जातात. )

प्रवेश १ ला समाप्त.

# अंक ३ रा—प्रवेश २ रा.

( स्थळः—विश्वासरावांचा बंगला. पात्रें:—विश्वासराव, रेवती )

**रेवती**—( विश्वासरावांच्यासमोर गुडघे टेकून ) मग द्यायची ना आज्ञा मला? इकडच्या संमतीवांचन मी स्वयंसेवक म्हणून नांव नोंदविलं याचा राग तर नाहींना आला?

**विश्वास**—रेवती, खरं विचारशील तर हें तूं बरं केलंस का वाईट केलंस हें समजण्याइतकं माझं डोकं माझ्या ताब्यात राहिलेलं नाहीं. तथापि नैसर्गिक मानवी हक्काच्या प्रस्थापनेपेक्षां कांहीं जास्त तूं केलं आहेस, असंहि मला वाटत नाहीं. स्त्री पुरुषाची अर्धांगी असली तरी स्वतःचा उद्धार स्वतंत्र रितीनं करून घेण्याचा प्रत्येकाचा हक्कच आहे, इतपत विचारशक्ति माझ्या ठिकाणीं शाबूत आहे! जळून गेला तरी पीळ कायम राहिलेल्या सुंभाप्रमाणं असलेल्या रूढीच्या उल्लंघनापलीकडं तुझ्याकडून कांहीं झालं आहे असंहि नाहीं! प्रत्येक प्राणी आपल्या कर्माबद्दल जबाबदार आहे, या न्यायानं तुला जर प्रस्तुतचा मार्ग पुरुषार्थाच्या दृष्टीनं परवडला तर आपाद गुलामगिरीच्या बंधनानं बद्ध झालेल्या मला तुझ्या पुण्यकार्याला दोष देण्याचा अधिकारच नाहीं! रेवती! कुलांगना आपल्या वागणुकीनं पुढच्या मागच्या अनेक पिढ्या उद्धरतात ही गोष्ट कल्पनागम्य असली तरी तुझ्यामुळं माझा स्वतःचा उद्धार होण्याचं लक्षण मला दिसतं आहे! देवते!

## पद.

**गुणखनी, कुलवति खरी योग्यतेची। वाटे ये भुवनिं**
**या देवि साची॥ धृ०॥**
**भवधाडि तूंतें खलसंहराया। आलीस किंवा जग**
**उद्धराया। माझ्या तपाचें फल बोलुं काया। मानवि**
**नच कृति तुझी देवतेची॥ १॥**

**रेवती**—असं काय चमत्कारिक बोलायचं तें ! इकडचा उद्धार करणार म्हणे मी ! या पायांच्या पुण्याईनच तर मला ही सद्बुद्धी झाली ! माझ्या मनाची पूर्ण वाढ होण्याला इकडनं वावच मिळाला नसतां तर ही पुण्यघटका मला लाभली तरी असती का ?

### पद.

**ठेवा थोर गुणांचा, लाधे सौभाग्याचा ॥ धृ० ॥**
**पदरीं पडलें पावन झालें, हाले दोल सुखाचा ॥ १ ॥**
**संगम सागरतटिनीचा वा । वाटे मंगलतेचा ॥ २ ॥**
**लेणें माझें बहु मोलाचें । मिथ्या नाहिंच वाचा ॥ ३ ॥**

परसेवेला सहज शिकवितां येणारी सासुरवासी शिकवण साफ झुगारून देऊन सोन्याहून उज्वल व गंगेसारख्या पवित्र वृत्तीनं लोकसेवा करून पर्यायानं देशसेवा करणारी इकडची संगती मला लाभली नसती तर—

**विश्वास**—रेवती ! या अभाग्याची एवढी स्तुती करूं नकोस ! या सेवेनं माझ्या हातून काय करायचं बाकी ठेवलं आहे ! सर्वस्वाचा संन्यास करून तुझ्या सत्पक्षाला मिळावसं मला वाटूं लागलं आहे ! पुण्यवंतांचं पारिपत्य हा कलियुगांतला कठोर विरोधाभास मला सहन होत नाहीं ! रेवती ! जा ! जा ! देवते ! पुण्यहृदये ! मी तुलाच उलटं वंदन करावं अशी तुझी योग्यता आहे ! रामरावाच्या मागोमाग सरलेनं स्वर्गाची पुण्याई हस्तगत केली. ! रेवती ! तुझाहि पुण्ययोग जवळ आला आहे ! आतां भेट सुटून सुखरूप आल्यानंतर ( थांबून ) किंवा–किंवा–महात्म्यांच्या पादस्पर्शानं पावन झालेल्या पुण्याश्रमांत ! जा !
( रेवती वंदन करते व निघते इतक्यांत रावसाहेब येतात. )

**रावसा०**—( रागानं ) अग पोरी, चाललीस कुठं ! मोठं मुष्किलीचं झालंय बुवा या जगांतलं राहणं ! मुलंमुली बापाचं ऐकत नाहींत ! बायका नवऱ्याच्या विचारांशीं विसंगत वागतात !

मित्राची मैत्री मानभावीपणाची वाटायला लागते ! असा हा मूर्खपणाचा कळस झालेला सगळीकड दिसतो आहे ! पोरी ! मी तुझा सख्खा मामा ना ? तुला तुझ्या माहेरच्या वडिलधाऱ्या माणसांपैकीं मी एकटाच शिल्लक आहेंना ? त्या नादान मंडळींत नांव नोंदविण्यापूर्वी मला एका शब्दानं तर विचारायचं होतंस !

**रेवती**—मामा ! झाली खरी ही चूक माझ्याकडनं. पण मी अगदींच खुळेपणानं वागलें नाहीं हो. ज्यांच्या पदरांत तुम्ही मला टाकलं त्यांची मला सदर परवानगी मिळाली आहे ! मामा ! मी चुकलें असलें तरी तुमचं मायाळू मन मला आशिवार्दच देईल अशी मला खात्री आहे. ( दहाचे ठोके पडतात. ) हें पहा दहा झाले ! मला वेळेवर कोर्टांत गेलंच पाहिजे ! माझी तपश्चर्येची मुदत संपली म्हणजे मी पुन्हां तुम्हांला नमस्कार करायला येईन ! [ जाते. ]

**रावसा०**—[कपाळावर हात मारून घेऊन] चावचळलेल्या तरुणांचीं ही भडकलेलीं डोकीं आणखी किती बिघडणार आहेत ईश्वराला ठाऊक ! ( विश्वासरावास ) दादासाहेब ! माझा आपला नात्यापेक्षां मैत्रीचाच जास्त संबंध आहे ! मी स्पष्टच विचारतों कीं तुम्हाला हें हिचं असं वागणं कसं पटलं ! कोंडून का नाहीं ठेवलीत हिला ! चांगली झोडपून काढायची म्हणजे आली असती वठणीवर ! उदार मतं झालीं म्हणून असलं उनाडपणाला चौखूर धांवूं देणारं उदारमतवादित्व मला संमत नाहीं ! ही पोरटी एवढीशी होती तेव्हांपासून माझ्याजवळ आहे ! रामरावाचा तसा निकाल झाला ! विचाऱ्यांची ती उद्दाम कारटी अशीच बेगुमान निघाली आणि ही पोरहि त्याच बेफामपणानं वागूं लागली ! जुन्या कल्पना, जुनी वागणूक, जुनी शिकवण, अशी चुटकी सरशी या गाढवांनीं पायाखालीं तुडविली !

**विश्वास०**—रावसाहेब ! जुलमाचा रामराम किती दिवस चालूं शकेल ? रांगत्या अवस्थेंतली शिकवण जाणत्या अवस्थेला कशी लागू

पडेल ? काळाचा पराक्रम कल्पनेला कळणार नाहीं ! नव्या जोमाचा निखारा आपणांला तापदायक वाटत असला तरी जरूर ती ऊब पोंचविण्याचं त्यांत सामर्थ्यहि आहे असा अनुभव येण्याकरितां कांहीं काल त्यांच्या सान्निध्यांत घालवावे लागतात ! रावसाहेब ! आपल्या प्रश्नाचीं उत्तरं देण्याची ताकद आतां माझ्यांत राहिली नाहीं !

**रावसा०**—अरेरे ! दादासाहेब ! मला तुमची कींव येते ! तुमच्यासारख्या भल्या माणसाचे हे विचार, व ही अनुकंपनीय स्थिति पाहून मला फार दुःख होतं ! अरे ! हो ! साडेदहा ! दादासाहेब ! मी जरा कोर्टांत जातों ! कशी झाली तरी रेवू माझी पोर आहे ! दंड भरून तिला मी सोडवून आणतों ! पण ती पोरटी त्याला कबूल होईल तर साऱ्या गोष्टी ! माझ्या मस्तकाच्या चिंधड्या झाल्या आहेत या भानगडीनं ! दादासाहेब ! आपली मोटार नेऊं का जरा कोर्टापर्यंत ?

**विश्वास०**—हो अगदीं खुशाल ! रामखिलावन ! ( "जी हुजूर" ) देखा ! मोटार तय्यार है ना ? ( "हां हुजूर" ) रावसाहेब जहां कहेंगे वहा उनको छोडकर सदर दप्तर मे ठैरो ! मै पाव पाव आता हूं ! यावं रावसाहेब ! ( रावसाहेब व रामखिलावन जातात. )

**विश्वास०**—(स्वगत) जा ! रावसाहेब खुशाल जा ! या वेड्या दिसणाऱ्या शाहाण्यांच्या अंतरंगाची आपणांला ओळख नाहीं, म्हणून आपल्या दृष्टीनं दिसणाऱ्या प्रामाणिक कल्पना आपण पुढें ठेवतां ! जिथं "शठं प्रति सत्यं" हें तत्त्व अंगिकारायचं आहे तिथं हा शिवाशिवीचा खेळ चालणारच नाहीं ! सत्य संकल्पाचं उदक सोडणारे हे सत्याग्रही वीर जुलमाचा जामीन आणि दंडाचा दंडक कसा अंगिकारणार ? भोळ्या जिवांनो ! तुमची वृत्ति भोळी, निर्मळ पण भुलावणीला भुलणारी आहे ! माझा अंतरात्मा आतां मला कांहीं निराळंच सांगत आहे ! स्वतंत्र मनोवृत्तीची जोपासना करायची असेल तर मला सोया सुखाची ही सेवावृत्ती टाकून देऊन शाश्वत सुखाची

सत्याग्रही वृत्ती धारण केली पाहिजे. ( टेबलावर लिहितात. ) हा माझा राजिनामा ! ( टेलिफोन. ) हॅलो ! हं ! मी देशमुख ! ठीक आहे, सांगा आलों म्हणून । हाय ! हाय ! संन्यासालासुद्धां विघ्न ! गहन सेवावृत्ती ! गहेरी गुलामगिरी ! हें काम केल्यावांचून सुटकाच नाहीं ! देऊं का टेलिफोननी राजिनामा !—माझ्या नोकरींत तो गुन्हा आहे ! मग—मग मी कसा वागूं काय करूं ! मला गेलंच पाहिजे ! इतकं मात्र खरं कीं—

**पद.**

**काव्यांतली गोडी कळाली । प्रतिभाच अभिनव ती**
**प्रगटली ॥ धृ० ॥**
**सदा शब्द जालीं । मति गुंग झाली ।**
**गहनता सुलभता । दे प्रभु भली ॥ १ ॥**

( जातात. )

**प्रवेश २ रा समाप्त.**

---

# अंक ३ रा—प्रवेश ३ रा.

[स्थळः—विचारे यांचें घर. पात्रेंः—विचारे व पार्वतीबाई व रावसाहेब.]

**पार्वती**—भावोजी ! काय झटलंत माझ्या सरूला 'इन्फ्लुंझा' झाला आहे म्हणून ? भावोजी ! नका हो असं म्हणूं ? मेली काळवेळ कांहीं सांगून येत नाहीं ! माझ्या बाळीची नि माझी ताटातूट या मेल्या वटवट्यांनीं केली, नी त्या सरकारला हीं माझ्या सोनुकलीची मुळीं दया आली नाहीं ! माझी कशी हो गत होईल ? भावोजी ! माझ्या मुलीला भेटूं देतील का हो मला ! मला घेऊन चलाना तिथं ! तुम्हीं खरंच तिला भेटून आलांत ना ? काय झणाली माझी बाळ ! माझी आठवण केली काहो तिनं ? मला विचारलं का ? हांसत होती का ती इथल्याप्रमाणं ? कुठं निजविली आहे तिला ? बिछाना तरी ठीक आहे का ?

मी ऐकलं तिथं रकट्यावरच पडावं लागतं ! भावोजी ! हें कोणत्या जन्मीचं पाप आम्हांला भोंवलं बरं ? गोपाळ कृष्णा ! आम्ही खरंच का रे कांहीं पाप केलं होतं ? नाहीं तर आमच्यावर तूं इतका कां रुष्ट झालास ? एकुलती एक माझी छबुकली, तिचंदेखील सुख पाहण्याचं आमच्या नशिबीं लिहिलें नाहीं का हो ? ( रडते )

**विचारे**–असा शोक केल्यानं काय होणार आहे बरं ? जरा धीर धरला पाहिजे ! सारे तेराच दिवस राहिले आहेत तिला सुटून परत यायला ! झाल्या गेल्या गोष्टीचं आतां काय ? हा कालाचा महिमा आणि आपल्या नशिबाच्या दावेदारीचा खेळ आहे ! आपण आतां कुणालाहि दोष दिला तरी नशिबीं आलं तें मुकाट्यानं भोगणं भाग आहे.

**पद.**

**नसे कांहीं मनुजा हातीं ॥ ध्रु० ॥**
**सर्व घडे तें ईश्वर योजी । सोड फुकाची भ्रांती ।**
**प्राप्त प्रसंगा धैर्य धरोनिच सूज्ञ तरोनी जाती ॥ १ ॥**

**रावसा०**—वहिनी ! तिच्या प्रकृतीबद्दल तरी निदान तुम्ही कांहीं काळजी करूं नका ! डॉक्टर गुडहार्ट फार भला माणूस आहे. त्यांनीं सांगितलं कीं ताप इन्फ्ल्यूएन्झाचा असला तरी फार मोठा नाहीं. एक दोन दिवसांत बरा होईल ! दुःखांत सुख एवढंच कीं तिची व रामरावाची व्यवस्था एकाच चांगल्या खोलींत केली असून आपली रेवती नर्स म्हणून त्यांनीं तिथं ठेवली आहे ! रेवूचा नर्सचा अभ्यास अशा वेळीं तरी उपयोगाला आला ही एक बरीच गोष्ट आहे म्हणायचं !

**पार्वती**–भावोजी ! दोघेहि नवरा बायको–कसले नवरा बायको–ऐन लग्नाच्या वेळीं ना असा हा घात झाला ! मेल्या चळवळ्यांनो ! माझ्यासारख्या किती आयांचे तळतळाट तुम्हाला लागत असतील ! भोंवतील बरं एखादे वेळेस तुम्हां साऱ्यांना ते ? सरू ! सरू ! आमची अगदीं माया तोडून जाण्याचं तुला कसं ग रुचलं ! माझ्या हातची कण्हेरीदेखील

आजारांत तुला आवडत नाहींनीं ! आम्ही कायं बरं तुझं असं वाईट केलं म्हणून तू असं आम्हांला दूर केलंस ! सरू ! सरू बाळ ! आतां मी काय करूं ! सांगा हो माझी न् माझ्या बाळीची आतां भेट कशी होईल तें ?

**रावसा०**–वहिनी ! जरा धीर धरा! तुम्हीच असं केल्यावर यांना तरी धीर कुणी द्यावा ? त्यांना का कमी दुःख होत आहे ! माझी ही पोर गेली ना ? मग माझं नाहीं का हृदय फाटलं ? पण दैवगतीला इलाज काय ? सत्ताधारी सरकारापुढं कुणाचं काय चालतं ! केवळ नाइलाज म्हणून मला रामरावाला शिक्षा नाहीं का द्यावी लागली ! कायद्यापुढं कुणाचं काय चालणार बरं ! तुम्ही धीर धरा. आज उद्यां मी तुमची भेट करवितों. मला जेलांत जाऊन पाहण्याचा पूर्ण अधिकार आहे. तुमच्याकरतां रोज मी तिकड जात जाईन, व सरू रामरावाच्या प्रकृतीबद्दल कळवीत जाईन बरं का ?

**पार्वती**—मला या धीराच्या गोष्टी समजतात बरं ! काय कळवणार तुम्ही ? सरू तिकडं तापानं फणफणत आहे हेंच कीं नाहीं ! सरू जवळ जायला त्या कुठंतरी नांव द्यायचं असतं नव्हे का ? देतें मी माझं नांव, नि जातें तिच्याजवळ ! तिच्या वांचूनमला चैनच पडत नाहीं ! अहो, मला केव्हां एकदां तिला भेटेन असं झालं आहे ! नि तुम्ही सांगतां एक-दोन दिवसाचा काल ! तिथले मेले कायदे मोठे कडक आहेत म्हणे नि तुमच्या तरी हातीं कसली सत्ता आली आहे ! अधिकाऱ्यांनीं नाहीं भेटूं द्यायचं म्हटलं तर ? रामराव—तुमच्या मित्राचा मुलगा रामराव–माझ्या सरूचा नवरा रामराव–तुमच्याच हातानं जेलांत गेला ना ? त्याला सोडून द्यायचं तुमच्या हातीं नव्हतं का ? तेव्हां कायदा आड आला नि आतांचा हा भेटीचा कायदा तुम्ही कसा तोडणार ! मला तुम्ही अगदींच खुळी समजतां होय ! मी नांव नोंदविणार, नि सरूला भेटायला जाणार ! माझी सरू ! सरू बाळ ! आलें बरं मी ! [मूर्च्छित पडते; भादवे व रावबहादुर सांवरतात. पडदा. ]

**रावसा०**—(पुढें येऊन) हरहर ! एकेक दृश्य हें असं कठोर व्हायला लागलं आहे ! ह्या बाईची अपत्यप्रेमाच्या वेडाची लहर खरी पण तिनं त्यांत मला मारलेले टोमणे खोटे कसे म्हणतां येतील ? माझी कायद्याची दिवटी हिनं आपल्या वेड्या शहाणपणानं झपाट्यासरशीं विझविलीन्! माझ्या या वागणुकींत स्वतंत्र मनाचं थोडं तरी अस्तित्व आहे का ? कायद्याच्या यंत्राचं एक चक्र बनून नाहीं का मी घाण्याच्या बैलासारखा आजवर फिरत आहें ! स्वातंत्र्य !! आजवर अगम्य अशा या सुंदर शब्दांतलं गांभीर्य मला आज या अडाणी समजल्या जाणाऱ्या बाईनं सांगावं यापेक्षां भगवंताच्या लीलेचा अगाध महिमा आणखी कोणता असूं शकतो ! आजवर केवळ अंधपणानं आक्रमिलेला राजमार्ग मला आतां नकोसा झाला आहे. असल्या अभागी अस्तित्वापेक्षां ह्या सात्विक संतांच्या तात्विक विजयांतच खरा आनंद मला दिसायला लागला आहे. हे अधिकार आणि हा डौल सारा फोल आहे. आज मी मोकळ्या मनानं, आणि असा चैरस्त्यावर उभा राहून म्हणणार—"महात्मा गांधीकी जय" !

[ विश्वासराव येतात. ]

**विश्वास०**—नमस्कार रावसाहेब !

**रावसा०**—दादासाहेब ! मी तुम्हाला हात जोडतों, मला आतां रावसाहेब म्हणूं नका. मी आपला साधा भादवे आहें. मिस्टर भादवे म्हणा पाहिजे तर किंवा बहुमानच द्यायचा असला, तर नानासाहेब, दादासाहेब किंवा माझं "भाऊ" हेंच नांव घेऊन त्यापुढं साहेब हीं अक्षरं लावा, पण तेवढं रावसाहेब म्हणूं नका ?

**विश्वास**—( स्वगत ) हें असं काय बरं झालं असावं ? अधिकाराच्या अनिवार हवेचा श्वेतसमुद्र जिथं भरला असायचा तिथं त्याच्या तिरस्काराचा तांबडा समुद्र कसा उत्पन्न झाला !

**रावसा०**—आश्चर्य नको वाटायला याचं ! माझा निश्चय झाला आहे

असा ! चुकीची दुरुस्ती आजपर्यंत चुकून राहून गेली होती, व चुकलेल्या गुराप्रमाणं चुचकारणाऱ्या दरवेशाच्या आश्रयांतून दैवयोगानं निघून मी आतां स्वगृहीं आलों आहे ! मला तुमच्या या पोषाखाचं आतां कांहींच वाटत नाहीं. दादासाहेब हा तुमचा मित्र आतां सात्विक आनंदाची लयलूट भोगायला खऱ्या देशभक्तीच्या भगव्या निशाणाचा स्वयंसेवक झाला आहे ! दादासाहेब ! हा विनोद नव्हे ! हें सत्य आहे !

**विश्वास०**—( सद्गदित होऊन ) भाऊसाहेब ! मी तुमच्या निश्चयाला प्रणाम करतों आणि केवळ रामरावाची भेट घ्यायला सोईचं व्हावं म्हणून एका दिवसाकरतांच मुद्दाम ठेवून घेतलेला हा पोषाख उतरून उद्यां तुमचा सेवक बनतों. आयुष्यांतील सत्कार्याच्या शुभकालाची सुप्रभात दाखविणाऱ्या या तेजोनारायणाला साक्षी ठेवून हें माझं हृद्गत मी आपणांजवळ उघडं करीत आहें. देशसेवेचं पुण्य लाभावं म्हणून परसेवेची शृंखला तोडण्याचा माझा निश्चय कायम झाला आहे. भाऊसाहेब ! चला. प्रथम आपण रामरावाची भेट घेऊं, व नंतर आपल्या कार्याची दिशा ठरवूं. आज आपली महात्माजींच्या नांवाची गर्जना माझ्या हृदयाला जाऊन भिडली.

### पद

**विचार ठरला न तो ढळे । प्रभाव दिसला स्वतंत्रतेचा**
**शुभकालीं वृत्तिही वळे ॥ धृ० ॥**
**जड-जीवन पर-सेवा-संग्रह । सत्वशाशीतें राहुच**
**कीं ग्रह । देव दानवी जणुं हा विग्रह । प्रबोध**
**जीवन आगळे ॥ १ ॥**

[ पडदा. ]

प्रवेश ३ रा समाप्त.

## प्रवेश ४ था.

[ **स्थळ**—जेल लायब्ररी–रामराव व सरला बिछान्यावर व जवळ नर्सच्या पोषाखांत रेवती. ]

**सरला**—रेवूमाई ! पूर्वजन्मीच्या लाग्याबांध्यानंच तूं आह्मांला लाभलीस म्हणायची ! त्यांची प्रकृती कशी आहे ? तूं त्यांच्या औषधीची खुराक वेळेवर दिलीस ना ? माझं औषध मीच घेत जाईन ! मला बरं वाटतं हो. पण त्यांच्याकड दुर्लक्ष करूं नकोस हं ! आज मी मेलें तर चिंता नाहीं पण हा उद्यांचा महात्मा गमावला तर साऱ्या देशाला दुःखांत लोटील ! माई ! पाहिलंस ? एवढे आजारी, तरी तोंडावरचं तेज कसं अगदीं कायमच आहे ! डॉक्टरनीं खोकल्याकरतां कांहीं दिलं का ग त्यांत ? प्रिसक्रिपशन् बघितलंस ना तूं ?

**रेवती**—ताई ! डॉक्टर गुडहार्ट नि डॉक्टर जाफर दोघेहि चांगलीं माणसं आहेत बरं. तूं औषधीची नी त्यांच्या प्रकृतीची कांहीं काळजी करूं नकोस. मी किनई तुमच्या दोघांच्याहिकड पूर्ण लक्ष देऊं शकतें हो ! तुला थोडं दूध देऊं का ?

**सरला**—त्यांना दिलंस ना पोटभर दूध ! माझं किनई पोट भरलेलंच आहे ! त्यांना पाज बरं थोडं; मी बघतें.

**रेवती**—( डोळ्यांत आसवें आणून ) ईश्वरा ! साऱ्या जगांत असला अतर्क्य प्रेमसंबंध पाहाण्याचं तूं माझ्याच एकटीच्या दैवीं लिहिलंस असं वाटतं ! प्रेमाच्या कामुक कारभाराचाच जमाखर्च, देवा ! तुझ्या चित्रगुप्ताच्या दरबारीं फार असेल, पण हें असं दिव्य प्रेम, स्वर्गीय प्रेम बघायला देवा ! तुझे हजारों डोळे देखील पुरणार नाहींत.

—पद—

**प्रेमा नवलपूर्ण यांचा । जगतीं या । जणुं**
**दैवी ही माव ॥ ध्रु० ॥**
**ठेवि प्रभो तूं सुकृपा सदा ती । कर जोडी**
**झाणिं पाव ॥ १ ॥**

**सरला**—माई ! रागवलीस का ग माझ्यावर तूं ? बोलत कां नाहींस ? देतेस ना दूध त्यांना ? सांग मी ह्मणतें द्या ह्मणून. माझं ऐकायचं खात्रीनं होईल बरं ? ( कण्हत ) अयाई ! माई ! या इथं कळ आली बघ !

**रामराव**— ( उठून ) काय झालं ? भोंवळ आली का ? मी येवूं का सांवरायला ? मी बरा आहें !–( सरलेच्या पलंगाजवळ येतो. )

**रेवती**—भावोजी ! आपण उठत नका जाऊं बरं बिछान्यावरनं ? डॉक्टरनीं काय सांगितलं ध्यानांत आहे ना ? आपलं हार्ट जरा वुईक आहे ! तशांत अंगांत ताप भारी ! खोकला कमी असला म्हणून काय झालं ?

**रामराव**—वहिनी ! माझं टेंपरेचर बघ, ताप किती कमी झाला आहे आज ! मला हिचीच भारी काळजी आहे ! (पाहून) ही निचेष्टीत पडली कीं ! जा बरं ! डाक्टरना टेलिफोन करा ! मी सांवरतों हिला तों-वर ! ( सरलेला आपल्या अंगावर सांवरतो ) ( डॉक्टर गुडहार्ट येतात. )

**डॉक्टर**—नर्स ! काय झालं असं हें एकदम ? डाक्टर जाफर, वुइल यू मेक ए स्टिम्युलंट डोझ फॉर दि गर्ल ? थँक्स !

**रेवती**—सकाळपासून सारखी दूध घे ह्मणून तिच्या पाठीस लागलें होतें. रामरावांनीं आज फक्त एकच वेळां दूध घेतलं. तिला वाटलं त्यांना कमी पडेल, म्हणून ती कांहीं केल्या दूध घेईना ! साहेब, या दोघांचं लग्न व्हायचं होतं त्याच दिवशीं—

**डॉक्टर**–( उसासा टाकून )माहीत आहे मला तें, नर्स ! तुह्मीं धैर्य सोडूं नका ! तुम्ही त्यांची अतिशय काळजीपूर्वक सुश्रुषा करीत आहांत. थोडे दिवस आणखी गेले कीं दोघेहि बरे झालेच समजा. ( स्टेथास्कोप लावून सरलेचें हार्ट तपासतात ) डॉक्टर जाफर डोझ आणतात.)(स्व.) आय वंडर, व्हाय दि हार्ट शुड बिकम सो वुईक ! (उघड) मिस्टर देशपांडे, आपण आपल्या बिछान्यावर जा ! मी आलोंच ! डॉक्टर जाफर ! प्लीज माईंड

दि डिस्पेन्सरी ! दीज पेशंटस् नीड मी हिअर ! ! (डॉक्टर जाफर जातात.) ( सरलेस ) बेटा ! डोळे उघड ! नर्स, ही पहा डोळे उघडायला लागली ! तुम्ही घाबरूं नका, केस डेंजरस नाहीं ! ( स्वगत. ) आय ॲम ॲफ्रेड हर लंग्स आर अफेक्टेड ! ( रामरावाजवळ जाऊन. ) मिस्टर देशपांडे, आपल्या डोळयांतून अश्रूं कां बरं आले ? पोरीची प्रकृति बरी आहे ! वुईकनेस हा असायचाच ! त्यांतून इन्फ्लूएन्झाचा ताप आहे !

**रामराव**–डॉक्टरसाहेब ! आपण रागावणार तर नाहीं ? एक विनंति करूं आपणांला ?

**डॉक्टर**–अगदीं खुशाल ! मिस्टर देशपांडे, तुम्ही मला आपला मित्र समजा.

**रामराव**—सांगा बरं माझी प्रकृति हल्लीं कशी आहे—

**डॉक्टर**–( स्वगत ) आय ॲम् हेल्ड इन ग्रेट फिक्स ! नाहीं ! तुम्हांला वाटत असेल, कीं मी फार आजारी आहें म्हणून ! ( तक्ता पाहून. ) तुमचं सकाळचं टेंपरेचर कांहीं फार नाहीं ! तुमचं हार्ट जरा––

**रामराव**–तेंच मी तुम्हांला विचारतों ! माझं टेंपरेचर त्या तक्त्यावर लिहिलेलं मी पाहिलं ! माझ्या हार्टमध्यें कळा होताहेत ! आपण मला हमी दिली तरी माझ्या भोळ्या मनाला वाटतं, डॉक्टरसाहेब !–आपल्या उपकाराबद्दल मी आपला उतराई आहे ! मला माफ करा !–मी कांहीं यांतून जगत नाहीं ! अयाई ! डॉक्टर साहेब ! ही बघा कळ निघाली ! अहो हें हार्ट फार दुखायला लागलं ! बघा कसे भाले मारताहेत ! ( सरलाहि अयाई करते. )

**रेवती**—ईश्वरा ! ज्यांच्या पुण्य चरित्राला मोहित होऊन, मी मागोमाग येथें आलें, त्या या माझ्या जिवींच्या जिवलगांची माझी ताटातूट खरोखरच होणार काय ? आई जगदंबे ! तेवढा दुःखाचा दिवस तरी मला दाखवूं नकोस ! यांच्यापूर्वीं मला मरण देशील तर बरं होईल !

**डॉक्टर**—नर्स ! ती बाटली ध्या बरं इकडं. चोळा इथं थोडंसं त्यांतलं औषध !

**सरला**—काय झालं त्यांना ! माई, मी येतें बरं चोळायला ! एवढी तरी सुश्रुषा होऊं दे माझ्या हातानं ! मी पापिणी—

**डॉक्टर**—( टेलिफोनवर जाऊन जाफरला बोलावतात. ) मिटस्र देशपांडे ! तुम्हांला कांहीं तरी वाटतं झालं ! तुम्ही लवकर बरें व्हाल ! ( रेवतीस. ) हं. इथं चोळा ! असं ! ठीक ! ( रामरावास ) का बरं वाटतं आतां ?

**रामराव**—होय, पण माझी विनंती नाहीं ध्यानांत घेतलीत ! आपण माझी इच्छा-एकच, शेवटची—

**डॉक्टर**—सांगा ! तुमची कोणतीहि इच्छा मी पूर्ण करतों !

**रामराव**—डॉक्टरसाहेब ! माझे गुरुदेव इथंच, या तुरुंगांत आहेत ; मरणापूर्वी एकदां त्यांची भेट व्हावी, अशी माझी इच्छा आहे ! ही एवढी विनंती मान्य कराल तर आपले उपकार होतील. ( डॉ. जाफर येतात )

**डॉक्टर**—( जाफरचे कानांत ) इन्फॉर्म रावसाहेब भादवे दॅट केसेस् आर सीरियस !–जस्ट वेट. ( कांहीं हळूच सांगतात. ) ( रामरावास ) डॉक्टर जाफरना महात्माजीकडे आपला निरोप घेऊन पाठविलं आहे ! महात्माजीनांच इकड बोलावलं आहे !

**रामराव**—छे. छे ! डॉक्टरसाहेब ! त्यांना कशाला एवढी तसदी ? ते माझे गुरुदेव आहे‌त ! मी जाऊं शकतो त्यांच्याकडं, आपली परवानगी असेल तर !

**सरला**—मीही येतें. अयाई ! !

**डॉक्टर**–सॉरी, यू ऑर अनफिट, युवर हार्ट माइट फेल. ( इतक्यांत पडदा दुभंगून चरक्यावर सूत काढीत असलेले महात्माजी दिसतात. जाफरच्या विनतीवरून ते पुढं येतात व रामरावाजवळ जाऊन उभे राहतात. )

**रामरावं**—पुण्यवंता ! आपल्या पायाची सेवा जन्मोजन्मीं घडावी एवढंच मागणं मागतों ! आपण केवळ माझ्या डोक्यावर हात ठेवलात ह्मणजे मी कृतार्थ झालों ! या पामराकडून झालेली बरीवाईट सेवा आपल्या चरणीं रुजू आहे !

**सरला**—संतश्रेष्ठा ! या आपल्या कन्येचेहि नमस्कार ग्रहण करा ! आपल्या पुण्याईची ही पामर सेविका—अयाई ( महात्माजी दोघांच्या डोक्यावर हात ठेवतात व परत जातात. डॉक्टर जाफर टेलिफोनवर मेसेज घेतात व गुडहार्ट यांना हळूच सांगतात. )

**डॉक्टर**—रावसाहेब भादव्यांच्या खटपटीला अखेर यश आलं ह्मणतां ! आजारामुळं रामरावांना झाली इतकी शिक्षा बस् असं समजून या सर्व सत्याग्रह्यांना सोडून दिल्याचं सरकारचं फर्मान दयाळूपणाचं आहे यांत शंका नाहीं. डॉक्टर जॉफर ! मेक ॲरेंजमेंटस्, क्वुईक प्लीज ! नर्स ! तुह्मां सर्वांना सोडून देण्याबद्दलचा आतांच हुकूम आला आहे ! मला फार संतोष झाला. तुम्हाला डॉक्टर जाफर बरोबर रवाना करतों. मेण्याची योजना करायला मी भादव्यांना कळवीत आहें. तुह्मी निर्धास्त असा. तुमच्या घरीं मी स्वतः येऊन यांना पहात जाईन. ( पडदा. )

प्रवेश ४ था समाप्त.

---

# प्रवेश ५ वा.

[ **स्थळः**—रस्ता—पात्रें:—भादवे. ]

**रावसाहेब**—( स्वगत ) झालं ! सारा कारभार आटपला ! माझा बाळ, माझा रामराव, सर गोविंदरावांचा, माझ्या जिवलग स्नेह्याचा एकुलता एक गृहमणी कृतांतकाळानं हिरावून नेला ! डॉक्टरचे सारे प्रयत्न पाण्यांत

गेले ! देशबांधवांच्या जयघोषांत तुरुंगांत जिवंत शिरलेला राष्ट्राचा जोमदार शिपाई, जीवनाची ज्योत कशीबशी जागती ठेवीत तुरुंगाच्या दाराबाहेर येतांच जगाचा निरोप घेऊन चालता झाला ! आर्यस्त्रीत्वाचं गौरवास्पद लेणं ल्यायलेली योगनिष्ठ सरला केवळ त्याच घडीला पतिनिष्ठेचा धवधवीत मळवट लावून सहगमनाला सिद्ध झाली ! मागं सिद्धांनाहि जें साध्य झालं नाहीं, ते या आजच्या काळच्या पोरांना साधलं याचं कारण—कारण काय ! म्हाताऱ्या बावळटा ! ही काळाची कोलांटी आहे ! पुण्याईच्या पुरुषार्थांची पदवी प्राप्त करून घेण्याकरितां द्यावयाची ही परमेश्वरी परीक्षा आहे ! या पोरांच्या जन्माच्या गांठी मरणानं बांधल्या ! कृतांताच्या कठोर काळजाला घरं पाडून त्याच्याच तोंडून शुभमंगल यांनीं ह्मणविलं ! आज आह्मां ह्मातार्‍यांना या पोरांनीं पावन केलं ! हाय ! हाय ! जुन्याची जपणूक करून जवळ जवळ जुलमाचा “ जो हुकूम ” नोकर बनलों ! बाळांनो ! मला क्षमा करा ! तुमच्या पुण्यात्म्यांना साक्षी ठेवून सांगतो, कीं आजपासून मी तुमच्या सांप्रदायाचा बंदा गुलाम झालों ! त्या पहा माझ्या बाळांच्या दैवी देहाला बिलगून उठणाऱ्या लाटा स्वर्गापर्यंत पोहोचायला लागल्या ! बाळांनो ! ! ( जातात. )

[ पडदा वर जातो चितेचा देखावा—सर्व पात्रें ]

**विश्वास**—बंधूंनो, रडूं नका ! या जळत्या जीवांना शेवटचा नमस्कार करा. मातृभूमीच्या पायावर आपखुशीनं बलिदान करणाऱ्या या भाग्यवंत जीवांचा हा स्वार्थत्याग अंतःकरणांत जागृत ठेवा ! पुण्यवंतांच्या अवसानाच्या दिवसाला पुण्यतिथी हें नांव असतं ! या सत्वधीर संन्याशांचं सुतक पाळायचं नसतं ! पुण्याईच्या परमावधीनं परलोकांस पोहोंचलेला यांचा पवित्र आत्मा तुम्हाला काय शिकवीत आहे याचा नीट विचार करा.

**रेवती**—महात्मा गांधीच्या नामाचा मरणापर्यंत जप करणाऱ्या या महाभक्तांच्या या अग्निवेष्टींत देहाला स्मरून माझ्या बांधवांनो ! प्रतिज्ञा करा कीं, यांच्या सात्विक सांप्रदायाचे आम्ही सर्वकाल संवर्धन करूं ! माझी सेवा ईश्वराच्या चरणीं रुजूं झाली ! यांच्या पायाचा लाभ मरेपर्यंत मला लाभला याबद्दल परमेश्वरा मी तुझी अत्यंत अभारी आहें ! स्वतः-च्या संसाराचं घर करीत असतां जगाच्या संसाराची सारखी काळजी वाहून शेवटीं स्वर्गापर्यंत एकमेकाची सारखी सोबत लाभलेल्या या पवित्र पतिपत्नींच्या चरणीं माझे सहस्रशः प्रणाम असोत.

**रावसा०**—रेवू ! या माझ्या करंट्या हातांनींच ग माझ्या बाळाला—

**रेवती**—मामा ! आतां काय त्याचं ? व्हायच्या गोष्टी होऊन गेल्या ! मानवी जीवनांतले हे चमत्कार असेच चालायचे ! सत्याचा सात्विक प्रकाश सरळ पोहोंचायला नेहमींच कठीण असतो ! सात्विकता स्वतःला मारून मरणाच्या दारीं मतांची मोजदाद करीत असते !

**विचारे**—खरंच रेवती ! तुझ्याही भाग्याचा आम्हाला हेवा वाटतो ! माझ्या पोरीचं रामरावाबरोबर मंगल झालं, सतित्वाचं वाण घेऊन ती कारागृहांत गेली, व मृत्यूच्या दाढेच्या सभामंडपांत तिनं आपल्या प्रेमळ प्रियकराच्या हातानं अखंड सौभाग्याचं मंगलसूत्र बांधून घेतलं ! विश्वास-राव ! तुम्ही सांगितलं तेंच खरं ! हा काल शोकाचा खास नव्हे ! आम्हांला आमच्या मुलांनीं स्वतः मरून पुनर्जन्म दिला ! मी यांच्या सांप्रदायाला नमस्कार करतों व माझी सर्व इस्टेट टिळक स्वराज्य फंडाच्या शिक्षण शाखेला बहाल करतों ! माझ्या सरलेचं व रामरावाचं पुण्यस्मारक कसं करायचं तें तुमचं तुम्ही ठरवा !

**विश्वास**—सर गोविंदरावाचा कोणीहि वारस आज जिवंत नसल्या-मुळें त्यांच्या मृत्युपत्राप्रमाणं त्यांची सारी इस्टेट माझ्याकडं येते. ती सर्व इस्टेट मी या जोडप्याच्या स्मारकार्थ यांच्या योगानं पवित्र झालेल्या या

अग्निनारायणाला साक्षी ठेवून आपल्या दोघांच्या स्वाधीन करतों व आह्मी दोघे त्यांच्या ध्येयाची आमरण जोपासना करण्याची शपथ घेतों. ( पार्वतीबाई येते )

**पार्वती**–(वेडाच्या लहरींत) माझी सरू आणलीत का हो तुह्मी ? हा मेल्यांनो ! ठेवलीत कुठं तिला ? दाखवा ना मला एकदां तिचं तें गोजिरवाणं तोंड ? माझ्या बाळीला माझ्या हातावांचून वेणीफणी की न्हाणं कधींच ठाऊक नाहीं ? असें हांसतां काय दांत काढून ? बघा मेले ! मला वेडीच समजतां का तुह्मी सारेजण !

**रेवती**—काकू ! आतां सरूच्या जागीं मी तुम्हांला ! सरूताई गेली; स्वर्गाचा जीना चढून तिनं देवलोकाला पावन केलं !

**पार्वती**–माझी बाळी आहेच तशी ! काय ह्मटलंस? तिचं नि रामरावाचं लगीन झालं ? असं चोरून लग्न लावलंन् ? लबाड भारी बाई हीं पोरं ! माझ्या बाळांनो ! नांदा बरं, सुखानं नांदा ! मला ह्मातारीला तुमचीं पोरं खेळवूं द्या बरं लवकर !! ( रेवतीस ) अग लबाडे! इतक्या जवळ होतीस नि बोलली नाहींस मुळीं माझ्याशीं ? चल घरीं, तुझ्या लग्नाचा मांडव अगदीं तस्साच ठेवला आहे बरं ! अँ ! तूं कोण ? नव्हेस तूं माझी सरू ! माझी सरू दाखवा हो मला कुणी !! ( पडद्यांत जाते. )

**रेवती**–देवा ! या माऊलीची दया येऊं दे रे तुला ! हिला अशी ही वेडाची लहर आलेली—

**विचारे**—हर हर ! हृदया ! या वेळीं तुला दगडापेक्षांहि कठीण झालं पाहिजे ( भाऊसाहेब ) मी हिला घरीं पोंहचती करितों.

( जातात. )

**भादवे**—हा कर्मभोग, दुसरं काय ? दादासाहेब ! अग्निनारायणानं या पुण्यात्म्यांना आपल्या स्वरूपाला मिळविलं ! चला आतां. ( डॉक्टर गुडहार्ट येतात. )

**डॉक्टर**—थांबा! माझ्या हिंदी बंधूंनों! तुमच्या सांप्रदायांत या आपल्या बंधूलाहि सामील करून घ्या. तुमच्या सांप्रदायाच्या स्वरूपाचं पूर्ण ज्ञान करून देणाऱ्या या जळत्या जीवांना, या निष्ठावान राष्ट्रभक्तांना मी प्रणाम करतों. आजपासून मी तुमचा झालों. दुर्दैवी हिंदराष्ट्राच्या उद्धारार्थ कायावाचामनेंकरून मी आजन्म झटेन, व माझ्या देशबांधवांना बजावून सांगेन कीं बाबांनो! या पुण्यशील लोकांबद्दल तुम्ही आपली भलतीच समजूत करून घेऊं नका. या अंतर्बाह्य निर्मळ मनांना दुखवूं नका. माझ्या देशबंधूंनो! या तपस्व्यांचा पाठिराखा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. आत्मबलाच्या जोरावर प्रत्यक्ष आत्मयज्ञ करायला सिद्ध झालेले हे अलौकिक साधू आहेत! पर्वतप्राय अडचणी यांच्या आत्मबलापुढें क्षणार्धांत नाश पावतील! जगांतलीं सारीं दुःखं याच मार्गानं टळतील व सुखाचा विसांवा केवळ आत्मबलाच्याच एका दिशेनं जगाला लाभेल! पुण्यवान वीरांनो! भगवंताच्या भाविक भक्तांनो! सात्विक समरांतल्या साध्या स्वारांनों! तुमच्याच कृतीनं जगाचा भाग्योदय होईल, या दृढ भावनेनं नवजीवन पावलेल्या या तुमच्या भक्ताचे प्रणाम गृहण करा!

**विश्वास**—अहाहा! आमच्या ध्येयाबद्दल अशींच सर्वांचीं मनें निःशंक होवोत, व जगावर निर्मल बंधुभावाचं साम्राज्य स्थापन होवो, अशी त्या जगदीश्वराजवळ मागणी मागूं या!

अंक ३ रा समाप्त.

५०३.४
७११२५

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

समाप्त.

रा. रा. बा. ना. पांडे यांचें नवीन नाटक.

# " पुनरागमन "

लिहून तयार असून त्याचा प्रयोग करूं इच्छिणाऱ्या नाटक मंडळ्यांनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा व समक्ष भेटावें.

**श्री लोकमान्यांना** महाराष्ट्रानें विसरणें शक्य नाहीं. त्यांचें 'पुनरागमन' व्हावें अशी प्रत्येक भारतीयाला तळमळ लागलेली आहे. या नाटकांतलें प्रसंगगौरव, कल्पनारम्यत्व व एकंदर सौंदर्य प्रत्येकाला रिझवील असें आहे. त्वरा करावी.

---

रंगभूमीवरील

# बोलका सिनेमा !

संगीतासह केवळ दोन तासांत होणारें संपूर्ण सुंदर नाटक.

रा. बा. ना. पांडे कृत

# वेणीचें वेड !

समक्ष भेटावें

विनायक अनंत देवधर,

बाई हरकुंवरची चाळ, वरचा मजला

ठाकोरद्वार, मुंबई २

# आम्हीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | संगीत औदार्याचा डंका ( सचित्र ) | १ रु. |
| २ | संगीत सुंदर मठ ( सचित्र ) | १ |
| ३ | संगीत सुदर्शन ( सचित्र ) | ०-१२ |
| ४ | सैतान नाटक ( बर्वे ) ... ... ... ... | १-० |
| ५ | गौळण मेळा अथवा कृष्ण गौळणींचीं पदें भजनी मंडळी व गाणारे शोकी लोकांकरतां | ०-१२ |
| ६ | संगीत कंसकंदन नाटक ( सचित्र ) | ०-१२ |
| ७ | अधिकमासमहात्म्य ( गोष्टी रूपानें ) | ०-१२ |
| ८ | जनाबाईचरित्र व अभंगाची गाथा | ०-८ |
| ९ | पद्यकुसुमांजली नवीन चालीवर | ०-२ |
| १० | राजस्थानची मूकसुंदरी कादंबरी | ०-८ |
| ११ | महायुद्धाचा पोवाडा ले. साधुदास | ०-२ |
| १२ | सचित्र मराठी अगर हिंदी मोटार गाईड | १-४ |
| १३ | सचित्र मोटार ड्रायव्हर टेक्स्टबुक | ०-१२ |
| १४ | कलियुगांतील तपश्चर्या | १-८ |
| १५ | धारवाडचा गोळीबार ०१०६ सैतानी जाळें | ०२ |
| १७ | कर्नाटकचा सिंह | ०२ |
| १८ | सचित्र कहाण्या व मंगळागौरीची आरती | ०४ |
| १९ | ब्रहन्निघंटरत्नाकर मराठी भाषांतर | ५-० |
| २० | सार्थमनुस्मृति | ५-० |
| २१ | शार्ङ्गधर मराठी भाषांतर | १-४ |
| २२ | माधवनिदान मराठी भाषांतर | १-४ |

याशिवाय सर्व प्रकारचीं पुस्तकें योग्य दरानें मिळतात.

बॉम्बे कमर्शिअल कंपनी, माधवबाग, मुंबई नं. ४.

# रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टचीं बटणें रु. ४ चंद्रहार रु. ३, गोट जोडी रु. २॥ पाटल्या जोडी रु. २॥ वज्रटीका रु. ४, ठुसी रु. ७ सरी रु. ४, नथ मोत्यांची रु. ५, आंगठी रु. १, सल्ले जोडी रु. १॥ बांगड्या जोडीस २॥ रु. घड्याळाचा छेडा रु. ३, कुडी मोत्यांची रु. ३,

# कॅस काळे करण्याचा साबण.

यानें कॅस काळे होऊन कायम रहातात. तीन डब्यांच्या बॉक्सला रु. १॥

# इमीटेशन मोतीं.

हीं मोत्यें हुबेहूब खऱ्याप्रमाणें असुन टिकाऊ व जड आहेत नथीसाठीं लहान मोठें ८५ मोत्यांचे सर रु. ३, कुडीकरितां ११० मोत्यांचा सर रु. ४,

# कॅस काळे करण्याच्या गोळ्या.

यानें कॅस काळे होऊन कायम रहातात बाटलीची किंमत रु. १॥,

**टाईमपीसः**—जर्मनी रु. ४॥; अमेरिकेन रु. ६; डबल अलार्म रु. ७; दद्रुविनाशक—गजकर्णावर औषध किं. ४ आणे २४. डब्या घेणारांस रास्कोप २६ वर रिस्टवॉच फुकट.

मगनलाल के. कं. अमृतवाडी, मुंबई. नं. ४

मुंबई हायकोर्टांत पास झालेलें

श्री. आ. बा. करगुटकर कृत

# सचित्र संगीत कंसकंदन

अर्थात

# कंसवध नाटक.

मुंबई हायकोर्टांत खटला चालून या पुस्तकाचे विक्रीसंबंधीं अधिकार आमचे कडेसच आल्या मुळें आम्हीं मुद्दाम तें सचित्र छापून प्रसिद्ध केलें आहे. किंमत १२ आ. ट. ख. वे.

**धी बॉम्बे कमर्शिअल कंपनी**, माधवबाग, मुंबई.

---

**विष्णु वामन बापट शास्त्री** सं. आचार्य व ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला **विनायक नारायण जोशी साखरे महाराज** वगैरे विद्वानांनीं उत्तम अभिप्राय दिलेलें नवीन पुस्तक.

# कलियुगांतील तपश्चर्या.

प्राचीन अनेक विद्यांपैकीं योगविद्येचेंच महत्व विशेष आहे. योगविद्येनें मानवी सामर्थ्य वाढतें. मानवी आणि दैवी चमत्कार सिद्धमहात्म्याचे उपदेशपर बोल गुप्त गुरुकिल्ली नैतिक सुधारणा नैसर्गिक तेजोवृद्धि मानसिक व शारिरीक बलवृद्धि. शांति समाधान नवग्रहांची अनुकूलता करून घेऊन प्रपंचसुखानें करतां यावा ही ईच्छा असल्यास हे पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवा किंमत १॥ रु. तुर्त टपाल खर्च माफ.